
सोमवार, ५ डिसेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक १३८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

कडेकोट सागरी सुरक्षेचा नौदलाकडून संकल्प/२
५० टक्के पदोन्नतीने केंद्रप्रमुख पदे भरण्यास मान्यता/५
राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धेत उत्तम माने यांचे यश/८

### ऑनलाईन गेमिंगसाठी लागू होणार नवीन नियम



**नवी दिल्ली** : भारतात ऑनलाइन गेमिंग मार्केट वेगाने वाढत आहे. देशातील गेमिंग क्षेत्राचे भविष्य लक्षात घेऊन नवीन नियम तयार केले जात आहेत. रिसर्च कंपनी रेडसीरचा अंदाज आहे की, गेमिंगचे क्षेत्र २०२६पर्यंत सात अब्ज डॉलरपर्यंत पोहचेल आणि यामध्ये रिअल मनी गेम्स महत्त्वपूर्ण असतील. केंद्र सरकार लवकरच ऑनलाइन गेमिंगचे नियमन करणार आहे. 'रॉयटर्स'च्या वृत्तानुसार पैशाशी संबंधित सर्व खेळांचे नियमन केले जाणार आहे. याअगोदर फक्त कौशल्य असलेल्या खेळांचे नियमन करण्याचा प्रस्ताव होता. अहवालानुसार सरकारने ऑगस्ट महिन्यात नियमावली बनवण्याचे काम एका पॅनेलला दिले होते. या पॅनेलने एक नवीन समिती स्थापन करावी आणि कोणत्या खेळात कौशल्य आहे की नाही हे ठरवले जाईल. मग नियम आणले जातील.

### मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचा पाहणी दौरा

# समृद्धी महामार्गाची टेस्ट ड्राईव्ह

**नागपूर : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. ४) समृद्धी महामार्गाच्या कामाची पाहणी केली. नागपूर ते शिर्डी टप्प्याचा त्यांनी या वेळी आढावा घेतला.





समृद्धी महामार्गाच्या ५२० किलोमीटर नागपूर ते शिर्डी या टप्प्याचे लोकार्पण ११ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी नागपूर-शिर्डीदरम्यान पाहणी दौरा केला. या पाहणी दौऱ्यात मुख्यमंत्री शिंदे यांच्या गाडीचे सारथ्य खुद्द उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

नागपूरपासून सुरू झालेल्या या पाहणी दौऱ्यात मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस हे एकाच गाडीतून दौऱ्यासाठी दुपारी साडेबाराच्या सुमारास निघाले. 'रस्त्याचे काम सुरू असताना मुख्यमंत्री शिंदे यांनी या मार्गावर गाडी चालवली. आता मी चालवत आहे,' असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले. या पाहणी दौऱ्यात रस्ते विकास महामंडळ, महसूल, पोलीस खात्याचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

नागपूरहून शिर्डीला टेस्ट ड्राईव्ह करताना ताफा वाशिममध्ये वारंगी कँपला जेवणासाठी थांबला होता. याशिवाय काही ठिकाणी सत्कारासाठीही मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री थांबले. सायंकाळी पाचच्या आसपास सर्व जण शिर्डीत पोहचले.

१० जिल्हे, २६ तालुके आणि ३९२ गावांतून हा महामार्ग जातो. या महामार्गामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक भागांची कनेक्टिव्ही वाढणार असून यातून विकास होण्यास मदत होणार असल्याची प्रातिनिधिक प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

# पनवेलमधील पडघे येथे विकासकामांचा शुभारंभ

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यात येत असून विविध सोयीसुविधा पुरविल्या जात आहेत. त्या अंतर्गत पडघे गावातील रस्त्याचे काँक्रिटीकरण आणि समाजमंदिर बांधकामाचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ३) करण्यात आले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिका क्षेत्रात विविध विकासकामे सुरू आहेत. त्या अंतर्गत ८८ लाख रुपये निधीतून पडघे येथे स्त्याचे काँक्रिटीकरण आणि समाजमंदिराचे बांधकाम करण्यात येत आहे.

भूमिपूजन कार्यक्रमास माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, तोंडरेचे माजी सरपंच राम पाटील, पडघेचे माजी सरपंच कृष्णा पाटील, दिलीप भोईर, गजानन पाटील, युवा नेते दिनेश खानावकर, माजी उपसरपंच पदू कांबळे, पांडू भोईर, नामदेव भोईर, गुरुनाथ भोईर, रघुनाथ भोईर, आशिष कडू, ॲड. पवन भोईर, नाथा भोईर, रूपेश कांबळे, कुणाल पाटील, प्रल्हाद भोईर, अंकुश पाटील, संजय कांबळे, राहुल कांबळे, विजय कांबळे, संतोष कांबळे, के. टी. भोईर, मनोहर पाटील, विष्णू पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# जुळ्या बहिणींशी लग्न तरुणाच्या अंगलट

**अकलूज : प्रतिनिधी**

सोलापुरातील जुळ्या बहिणींचा एकाच तरुणासोबत झालेल्या लग्नाची सध्या महाराष्ट्रभर चर्चा आहे, पण हे लग्न नवरदेवाच्या अंगलट येण्याची शक्यता आहे. या प्रकरणी पोलिसात अदखपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**गुन्हा दाखल**

सोलापूर जिल्ह्याच्या अकलूज तालुक्यातील माळशिरस येथे अतुल उत्तम अवताडे या तरुणाने पिंकी आणि रिंकी या जुळ्या बहिणींसोबत लग्न केले. मुंबईतील या जुळ्या बहिणी आयटी इंजिनियर आहेत, तर माळशिरस तालुक्यातील महाळुंग येथील अतुलचा मुंबईत ट्रॅव्हल्सचा व्यवसाय आहे. सहा महिन्यांपूर्वी रिंकी, पिंकी आणि त्यांची आई आजारी पडली होती. त्या वेळी अतुलच्या गाडीतून त्या दवाखान्यात जात असत. अतुलने या कुटुंबाची आजारपणात काळजी घेतली. त्यातून त्यांची जवळीक वाढली. अशातच पिंकीला अतुल आवडू लागला. त्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला, पण दोघी बहिणींना लहाणपणापासून एकमेकींची सवय असून त्या वेगळ्या राहू शकत नसल्याने त्यांनी एकाच मुलासोबत लग्न करण्याचा निर्णय घेतला. कुटुंबीयांच्या संमतीने त्यांचा ३ डिसेंबर रोजी अकलूजजवळील गलांडे हॉटेलमध्ये विवाह झाला.

या अनोख्या लग्नाचे व्हिडीओ, फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. दरम्यान, याबाबत माळेवाडी येथील राहुल फुले यांनी पोलिसांत तक्रार दिली होती. त्यानुसार अकलूज पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आता या नवरदेवावर काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आजपासून माथेरानमध्ये ई-रिक्षा धावणार

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरानमध्ये सोमवार (दि. ५)पासून ई-रिक्षासेवा सुरू होणार आहे. त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

माथेरान प्रदूषणमुक्त रहावे यासाठी ब्रिटिश काळापासून येथे वाहनांना बंदी आहे. त्यामुळे घोडा व माणसाने ओढणाऱ्या हातरिक्षा यांचा वापर अंतर्गत वाहतुकीसाठी केला जातो, मात्र ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व महिलांची दमछाक होते. आता हा त्रास दूर होणार आहे. त्याचबरोबर हातरिक्षाची अमानवी प्रथा हद्दपार होणार आहे.



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

## निवडक

### गुजरातमध्ये आज दुसऱ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया

**अहमदाबाद** : गुजरात विधानसभा निवडणुकीतील दुसऱ्या व अखेरच्या टप्प्यासाठी सोमवारी (दि. ५) मतदान होणार आहे. या ९३ मतदारसंघांत ८३३ उमेदवार रिंगणात आहेत. दुसऱ्या टप्प्यातील प्रमुख उमेदवारांत मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, पाटीदार नेते हार्दिक पटेल आणि ओबीसी नेते अल्पेश ठाकोर यांचा समावेश आहे. ८ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे.

### इराणमध्ये हिजाबविरोधातील आंदोलनास अखेर यश

**तेहराण** : इराणमध्ये जवळपास दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या हिजाबविरोधात आंदोलनापुढे सरकार झुकले आहे. इराणमधील 'संस्कृतीरक्षक पोलीस' हे युनिट बंद करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यांच्या मारहाणीत एक २२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर इराणमधील महिला संस्कृतीरक्षक पोलिसांच्या विरोधात रस्त्यावर उतरल्या होत्या.

# जागतिक दिव्यांग दिन साजरा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शांतादेवी दिव्यांग सामाजिक विकास संस्थेच्या वतीने पनवेल तालुक्यातील गव्हाण येथे शनिवारी (दि. ३) जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला दिव्यांगांसाठी सतत खंबीरपणे उभे राहणारे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बोलताना सांगितले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अपंगांना स्वतःमध्ये कमतरता वाटू नये याकरिता त्यांना दिव्यांग हा शब्द दिला. त्याचप्रमाणे राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारनेदेखील दिव्यांग बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय स्थापन केले आहे. या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांना आपले हक्क मिळावे यासाठी आपण सर्व जण मिळून काम करूया.

गव्हाण ग्रामपंचायत कार्यालयाजवळ झालेल्या या कार्यक्रमाला उद्योजक जे. एम. म्हात्रे, उपसरपंच विजय घरत, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, भाजप तालुका चिटणीस जयवंत देशमुख, शांतादेवी दिव्यांग सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक हाडकू कोळी, अध्यक्ष अशोक कोळी, प्रमोद कोळी, अशोक कडू, जनार्दन कोळी, स्मार्टकेअर डायग्नोस्टिक सेंटरच्या डॉ. दीपाली गोडघाटे, सागर रंधवे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व दिव्यांग बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ठाकरे गटाला पनवेलमध्ये धक्का

# माजी नगरसेवक रमेश गुडेकर बाळासाहेबांच्या शिवसेनेत दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील माजी नगरसेवक रमेश गुडेकर यांनी शनिवारी (दि. ३) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला. पनवेलमध्ये हा ठाकरे गटाला धक्का आहे.



पनवेल अर्बन बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत उमेदवारी निश्चित करण्यावरून रमेश गुडेकर आणि शिवसेना ठाकरे गटातील वरिष्ठ नेत्यांमध्ये वाद झाल्याचे समजते. याबाबत एक पत्रक जारी करून गुडेकर यांनी स्पष्ट नाराजी व्यक्त केली होती. जिल्हा सल्लागार पदावर असूनही जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी त्यांची हकालपट्टी केली. यानंतर शिंदे गटाचे महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांनी लागलीच गुडेकर यांची भेट घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेनेत प्रवेश करण्याबाबत मध्यस्थी केली.

या पक्षप्रवेशावेळी सोमण यांच्यासोबत पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनवणे, संघटक अभिजीत साखरे, उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी, प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान आदी पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, यापुढेही बाळासाहेबांच्या शिवसेनेचे रायगड जिल्हा सल्लागार म्हणूनच काम करण्याचे आदेश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्याचे गुडेकर यांनी सांगितले.

# अटल करंडक हाच एकांकिका विश्वात एक ब्रँड

**पनवेल : नितीन देशमुख**

*आतापर्यंत आपण वेगवेगळ्या मोठ-मोठ्या स्पर्धांचे ब्रँड ॲम्बेसिडर असल्याचे ऐकले होते. एकांकिका स्पर्धेला ब्रँड ॲम्बेसिडर अशी संकल्पना नव्हती, पण गेल्या आठ वर्षांत अटल करंडक हाच एकांकिका विश्वात एक ब्रँड झालेला आहे. त्यामुळे त्यांनी त्याला एक वेगळी ब्रँड ॲम्बेसिडरची टर्म क्रिएट केलेली आहे. यापूर्वी ओंकार भोजने अटल करंडकचा ब्रँड ॲम्बेसिडर होता. या वर्षी मला ती संधी मिळाली आहे. आम्ही सगळी एकांकिकेत काम केलेली माणसे आहोत. आयुष्यभर पथनाट्य, नाटुकल्या व एकांकिका करीतच वेगवेगळ्या ठिकाणी काम करण्याचा प्रयत्न केला. आमच्यासाठी खऱ्या अर्थाने ऑडिशन म्हणजेच एकांकिका होत्या. हे उद्गार आहेत अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचा ब्रँड ॲम्बेसिडर आणि सुप्रसिद्ध अभिनेता पृथ्वीक प्रताप यांचे.*

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये आयोजित राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रंगली. त्या वेळी पृथ्वीक प्रताप 'रामप्रहर'शी विशेष मुलाखतीमध्ये संवाद साधत होते.

### सुप्रसिद्ध अभिनेता पृथ्वीक प्रताप यांचे उद्गार



माझी तीन-चार वर्षे शैक्षणिक सत्र सुरू होती. त्या वेळी मी फक्त आणि फक्त गर्दीतच काम करीत होतो. तेव्हा अशी काही काम करण्याची संधी मिळाली नव्हती, पण आज त्याचा खूप अभिमान वाटतो की, गर्दीतून कुठून तरी सुरुवात केली होती. आज सीटवरून बॅक स्टेज व फ्रण्टला येणे आणि स्पर्धेचा चेहरा बनणे ही अभिमानाची गोष्ट असल्याचे माझ्या मित्रांना वाटते. एकांकिका करणाऱ्या मुलांना वाटते की, एक आपल्यातलाच आपल्यासारखाच एक मुलगा आज एका स्पर्धेचा ब्रँड ॲम्बेसिडर होतो हेच माझ्यासाठी खूप मोठे आहे. त्यामुळे ब्रँड ॲम्बेसिडर ही टर्म माझ्यासाठी एका ब्रँडशी रिलेटेड राहिलेली नाही. ती एक इमोशन झालेली आहे, जी माझ्यातल्या एका माणसाशी मला फार रिलेट करावीशी वाटते, असे पृथ्वीक प्रताप यांनी नमूद केले.


या वर्षी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा पुरस्कृत भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकपात्री, द्विपात्री राज्यस्तरीय अभिनय स्पर्धेला मी परीक्षक होतो. तेव्हा अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची घोषणा झाली. त्या वेळी माहीत नव्हते की, ब्रँड ॲम्बेसिडर कोण असणार? पण माझ्या नावाची चर्चा सुरू असल्याचे समजले होते. मला फार बरे वाटले आणि मग मला आयोजकांनी एक सुखद धक्का दिला. त्याचा मला आनंद झाला, असे पृथ्वीक प्रताप यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आज सुरू असलेली अटल करंडक स्पर्धा उत्कृष्ट दर्जाची आहे. राज्यात पाहिले तर ३६५पैकी ३४० दिवस कोठे ना कोठे एकांकिका स्पर्धा सुरू असते. परीक्षकांना फक्त २० दिवस आराम मिळत असेल. त्या सगळ्याच स्पर्धा चांगल्या आहेत, पण त्यामध्ये अटल करंडक स्पर्धा उजवी ठरते, कारण 'अटल'कडे शिस्त आहे. आयोजकांकडे शिस्त असते, मात्र ती इतर ठिकाणी अमलात आणली जात नाही. 'अटल'कडे ती अमलात आणली जाते. ते महत्त्वाचे असते, असे मला सांगावेसे वाटते. (पान २ वर..)

# कशेळे येथील ज्वेलर्स मालकाचा संशयास्पद मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे येथे व्यवसाय करणाऱ्या राजेंद्र ज्वेलर्स दुकानाचे मालक हरीश रजपूत यांचा मृतदेह नेरळजवळ संशयास्पद स्थितीत आढळला आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे.



डोंबिवली येथील हरीश रजपूत यांनी सहा वर्षांपूर्वी कशेळे येथे ज्वेलर्स व्यवसाय सुरू केला होता. काही महिन्यांपूर्वी ते ठाकूर्ली येथील नवीन ठिकाणी राहायला गेले होते आणि तेथून दररोज नेरळला लोकलने व पुढे दुचाकीने कशेळे येथे जात. शनिवारी (दि. ३) दुकान बंद करून नेहमीप्रमाणे कशेळे येथून ते नेरळ येथे येण्यासाठी निघाले होते, मात्र घरी नेहमीच्या वेळी पोहचले नाहीत. त्यांचा मोबाइल फोन रात्री सव्वाआठ वाजल्यापासून बंद होता. शेवटी रजपूत यांच्या घरच्या लोकांनी पोलिसांत तक्रार दिली.

पोलिसांना पाहणीत उल्हास नदीवरील वाकस पुलाच्या अलिकडे नेरळला जाणाऱ्या रस्त्यावर हरीश रजपूत यांचा मृतदेह आणि दुचाकी अपघातग्रस्त अवस्थेत आढळून आली, मात्र घटनास्थळी मृतदेहाच्या आसपास असलेली परिस्थिती पाहता हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. रजपूत यांच्यावर लोखंडी हत्याराने वार केले असून त्यांचा मोबाईल तसेच पैसे यापैकी काहीही आढळून आले नाही. त्यामुळे पोलिसांनी त्या दृष्टीने तपास सुरू केला आहे.

(सविस्तर वृत्त पान २ वर..)

## वादग्रस्त दापोली साई रिसॉर्ट प्रकरण

# ईडीकडून ग्रामपंचायतीची झाडाझडती


**मुंबई : प्रतिनिधी**

भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सातत्याने लक्ष्य केलेल्या दापोलीतील साई रिसॉर्टप्रकरणी आता ईडीने थेट मुरूड ग्रामपंचायतीवर धडक दिली असून काही कागदपत्रे ताब्यात घेतली आहे.

ईडीने तत्कालीन सरपंच आणि सध्याचे सरपंच यांचीदेखील चौकशी केली आहे. त्यांना आता पुढील चौकशीसाठी मुंबईत बोलावण्यात आले आहे. सोमय्या यांच्या दाव्यानुसार, हे साई रिसॉर्ट शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांच्या मालकीचे आहे, तर अनिल परब यांनी याआधीच आपला काहीही संबंध नसल्याचे म्हटले आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या दापोली तालुक्यातील मुरुड या गावच्या किनाऱ्यावर साई रिसॉर्ट उभारण्यात आले आहे. हे रिसॉर्ट उभारताना सीआरझेड कायद्याचे उल्लंघन झाले असून मनी लॉंड्रिंगही करण्यात आली असल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला. किरीट सोमय्या यांनी प्रतिकात्मक हातोडा घेत दापोलीमध्ये रॅली देखील काढली होती. या रिसॉर्टची मालकी

### सरपंचांची चौकशी



माजी मंत्री अनिल परब यांची नसून आपली असल्याचा दावा करीत सदानंद कदम यांनी हायकोर्टात धाव घेतली आहे. या प्रकरणाची हायकोर्टात सुनावणी सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणी ईडीने मुरुड ग्रामपंचायतीमध्ये दाखल होत काही कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत. शिवाय विद्यमान आणि तत्कालीन सरपंच यांचीदेखील चौकशी करीत त्यांना मुंबईत बोलावल्याची माहिती सामोर आहे.

मागील आठवड्यातच बुधवार आणि गुरुवारी ईडी मुरुड इथे दाखल झाली होती. त्यानंतर काही कागदपत्र घेत अधिकारी मुंबईत रवाना झाले. त्यामुळे आता विविध चर्चांना सुरुवात झाली आहे.

साई रिसॉर्टप्रकरणी काहीच दिवसांपूर्वी सोमय्या यांनी दापोलीत येत रिसॉर्ट तोडण्याचा दावा केला होता, पण सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून त्याबाबत कोणतीही कारवाई करता येणार नाही. आता ईडीने काही कागदपत्रे ताब्यात घेतली आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या दापोली तालुक्यातील मुरुड समुद्रकिनारी असलेल्या वादग्रस्ताच्या शाहीर रिसॉर्ट प्रकरणात माजी परिवहन मंत्री आणि रत्नागिरी जिल्ह्याचे माजी पालकमंत्री अनिल परब यांच्यासह आणखी दोघांविरोधात कलम ४२० अंतर्गत दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शासनाचा महसूल बुडवत फसवणूक केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. दापोलीच्या गटविकास अधिकारी रूपा दिघे यांनी दिलेल्या जबाबानुसार ही कारवाई केली गेली होती.

# कशेळे येथील ज्वेलर्स मालकाचा संशयास्पद मृत्यू; घातपाताचा संशय

**कर्जत : प्रतिनिधी**

कशेळे येथील राजेंद्र ज्वेलर्स या दुकानाचे मालक हरीश रजपूत हे आपल्या दुचाकीवरून नेरळ रेल्वेस्टेशनकडे येत असताना त्यांच्या दुचाकीला अपघात झाला. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला, मात्र रजपूत यांच्या मृतदेहावर शस्त्राने वार केल्याच्या खुणा असल्याने त्यांचा खून झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. त्यादृष्टीने नेरळ पोलिसांकडून तपास सुरू असून अलिबाग येथून श्वानपथक घटनास्थळी पोहचले आहे. अपघातस्थळी रजपूत यांचा मोबाईल आढळला नसल्याने पोलिसांचा संशय बळावला आहे.

डोंबिवली येथील हरेश रजपूत यांनी सहा वर्षांपूर्वी कशेळे बाजारपेठेत ज्वेलर्सचा व्यवसाय सुरू केला. ते दररोज नेरळ ते कशेळे हा प्रवास ते आपल्या दुचाकीवरून करीत असत. मुंबई येथे मालाची खरेदी करण्यासाठी जायचे असल्याने रजपूत हे शनिवारी (दि. ३) लवकर दुकान बंद करून सायंकाळी सव्वासात वा. नेरळकडे निघाले होते, मात्र आपल्या घरी नेहमीच्या वेळी पोहचले नाहीत. रजपूत कुटुंबियांनी कशेळे येथे आपल्या ओळखीच्या लोकांना फोन करून चौकशी केली असता दुकान बंद असल्याची माहिती देण्यात आली. त्यात हरीश रजपूत यांचा मोबाइल फोनदेखील बंद होता. शेवटी रजपूत यांच्या दोन्ही कन्या थेट नेरळ पोलीस ठाण्यात मध्यरात्रीनंतर पोहचल्या. पोलिसांनी तपासाला सुरुवात केल्यानंतर उल्हास नदीवरील वाकस पुलाच्या अलिकडे नेरळकडे जाणाऱ्या रस्त्यावर हरीश रजपूत यांची दुचाकी अपघातग्रस्त अवस्थेत आढळली, तसेच खाली शेतामध्ये हरीश रजपूत यांचा मृतदेह आढळला.

घटनास्थळावरील परिस्थिती लक्षात घेऊन हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. हरीश रजपूत यांच्या डोक्याला मार लागून अपघातस्थळी त्यांचा मोबाईल तसेच पैसे यापैकी काहीही नाही. त्यामुळे पोलिसांनी त्या दृष्टीने तपास सुरू केला आहे. रविवारी श्वानपथकाने अपघातस्थळाची पाहणी केली. या घटनेची नोंद नेरळ पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यू अशी करण्यात आली आहे.

**मृतदेहावर लोखंडी हत्याराचे वार**

हरीश रजपूत यांच्या मृतदेहाची तपासणी केली असता, गालावर आणि पोटात लोखंडी हत्याराने वार केल्याचे दिसून येत आहे. घटनास्थळी हरीश रजपूत यांच्या पायातील बूट तसेच पडून होते.



**अतिरिक्त पोलीस अधीक्षक घटनास्थळी**

जिल्हा अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे नेरळ येथे दाखल होत त्यांनी कर्जत पोलीस उपअधीक्षक विजय लगारे, नेरळ प्रभारी पोलीस राजेंद्र तेंडुलकर, कर्जत पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे यांच्याशी चर्चा केली.

# कर्जतमधील विविध विकासकामांचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील शिरसे-आवळस गावाला जोडणाऱ्या उल्हास नदीवरील पुलाच्या बांधकामाचे तसेच जलजीवन मिशन अंतर्गत आवळस गावासाठी पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले.

आवळस गावाकडील नदीच्या काठावरील मैदानावर भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शिरसे-आवळस गावादरम्यान उल्हासनदीवर तीन कोटी २१ लाख ४० हजार रुपये खर्चाच्या पुलाचे तसेच ६१ लाख १० हजार रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन करण्यात




आले. या वेळी माजी सरपंच संतोष भोईर, जयेंद्र देशमुख, विधानसभा संपर्क प्रमुख पंकज पाटील, कर्जत शहर अध्यक्ष अभिषेक सुर्वे, जलजीवन मिशनचे उपअभियंता सुरेश इंगळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजीव वानखेडे, शाखा अभियंता अक्षय चौधरी, सचिन करडे, हरिश्चंद्र सुर्वे, कुंडलिक शिंदे, रमेश मोरे, अशोक कदम, रविंद्र भोईर, अशोक तरडे, हरिभाऊ कदम, बबन भोईर, हरिश्चंद्र तेरडे, रामदास पार्टे, जनार्दन जाधव, चंद्रकांत जाधव, बच्चू शिंदे, अशोक खेडेकर, संतोष कदम, सुनील कदम, रवींद्र जाधव, कैलास भोईर, चिमण जाधव, दीपक जाधव आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार महेंद्र थोरवे यांनी, मी मंदिरात दर्शनासाठी आलो असता मला नळपाणी पुरवठा योजना आणि शिरसे ते आवळस पुलाची मागणी ग्रामस्थांनी मागणी केली होती. तो शब्द आज मी पूर्ण करीत आहे. आपल्याला शाश्वत विकास करायचा आहे. या भागातील असलेल्या अन्य समस्या असतील त्यासुद्धा मला सांगा. ती कामेसुद्धा आपण मार्गी लावू, असे आश्वासन दिले. संतोष भोईर यांनी, येथे पूल व्हावा अशी या भागातील सर्वांचीच इच्छा होती. २५ गावांसाठी याचा लाभ होणार आहे आणि खोपोलीकडे जाण्यासाठीचा १०-१२ किमीचा वळसा वाचणार आहे, असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संतोष जाधव यांनी केले.



# कामगार नेते कै. भाई कोतवाल यांची जयंती साजरी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलायझर्स लिमिटेडमध्ये (आरसीएफ) ज्येष्ठ कामगार नेते कै. भाई मनोहर कोतवाल यांच्या १०७व्या जयंतीनिमित्त बॅगिंग प्लांटमध्ये त्यांचे प्रतिमा पूजन केले.

या वेळी आरसीएफ पदाधिकारी गोडबोले, शेंडे, नलावडे उपस्थित होते. त्यांनी कामगारांना काम करताना कोणती काळजी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले, तसेच नामदेव कटरे यांनी कामगारांना भाई मनोहर कोतवालांविषयी माहिती सांगितली. त्यानंतर स्वच्छ भारत अभियानांतर्गत बॅगिग प्लांट साफसफाई करण्यात आली.

त्यानंतर येथे काम करणाऱ्या माथाडी कामगारांनी श्री समर्थ कृपा वृद्धाश्रम परहूरपाडा येथे भेट दिली. तेथे प्रतिमापूजनसाठी मुंबई ट्रांसपोर्ट अँड डॉकवर्कर्स युनियनचे सचिव निवृत्ती धुमाळ उपस्थित होते. त्यांनी सर्व कामगारांना भाई मनोहर कोतवाल यांच्याविषयी माहिती सांगितली. नंतर तेथील वृद्धांना तीन महिने पुरेल एवढे रेशन वाटप करण्यात आले.

# कडेकोट सागरी सुरक्षेचा नौदलाकडून संकल्प

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑगस्ट महिन्यात श्रीवर्धन-हरिहरेश्वर किनाऱ्यावर थडकलेल्या निर्मनुष्य बोटीमध्ये शस्त्रे आढळल्याने खळबळ उडाली होती. या घटनेची रितसर चौकशी करण्यात आली, यामध्ये तीन महत्त्वाच्या त्रुटी राहिल्याने उघड झाले, असे भारतीय नौदलाच्या पश्चिमी मुख्यालयाचे प्रमुख व्हाइस अॅडमिरल अजेंद्र बहादूर सिंग यांनी शनिवारी (दि. ३) नौदल दिनानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत सांगितल. त्रुटी लक्षात आल्यानंतर तेवढ्याच तातडीने त्या दूर करण्यासाठीची पावले उचलण्यात आली असून सागरी सुरक्षा कडेकोट करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

व्हाइस डमिरल म्हणाले की, रडार यंत्रणा सध्या महत्त्वाच्या ठिकाणांवर बसविण्यात आली आहे. प्रत्येक रडारची स्वत:ची एक क्षमता असते आणि मर्यादाही. दोन रडार यंत्रणांमध्ये काही अंतर असे आहे जे रडारच्या कक्षेत येत नाही. ही बोट नेमकी याच पट्ट्यातून किनारपट्टीवर येऊन थडकली, असे ते म्हणाले.

**महिला अग्निवीरांचा सहभाग**

*अग्निपथ योजनेअंतर्गत अग्निवीरांची भरती सुरू आहे. भारतीय नौदलात सुमारे तीन हजार ४७४ अग्निवीर असून त्यापैकी सुमारे ३४० महिला अग्निवीरांचा सहभाग आहे. या सर्वांची सध्या वैद्यकीय तपासणी सुरू असून ती पूर्ण झाल्यावर अग्निवीर नौदलात सहभागी होतील, अशी माहिती सिंग यांनी दिली.*

## उद्योगांसाठी महाराष्ट्र देशात अव्वल

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये उद्योग करण्यास महाराष्ट्र अव्वल आहे, असे ब्रिटन-भारत व्यवसाय परिषदेने (युके इंडिया बिझनेस कौन्सिल)ने प्रकाशित केलेल्या नोव्हेंबर २०२२च्या अहवालात नमूद केले असल्याची माहिती उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी दिली आहे.

डुइंग बिझनेस इन इंडिया : द युके परस्पेक्टिव्ह (२०२२ एडिशन) हा युके इंडिया बिझनेस कौन्सिलचा आठवा वार्षिक अहवाल आहे. त्यामध्ये भारतातील व्यावसायिक वातावरणाविषयी ब्रिटनमधील व्यवसाय आणि उच्च शिक्षण संस्थांची मते आणि अनुभव मांडण्यात आले आहेत. या अहवालात, व्यवसाय चालविण्यासाठी पोषक वातावरणाच्या बाबतीत महाराष्ट्राला सर्वोच्च मानांकन देण्यात आले आहे. त्यानंतर गुजरात, चंदीगड, हरयाणा, हिमाचल प्रदेश, आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेशचा क्रमांक आहे. या अहवालात पाचपैकी ३.३३ गुणांसह महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे.

# वक्तृत्व व निबंध स्पर्धेत गव्हाण विद्यालयाचे वर्चस्व



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या रायगड विभागाच्या वतीने विभागीय स्तरावर कृतज्ञता सप्ताह आयोजित करण्यात आला. त्या अनुषंगाने उरण गटात नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व आणि निबंध स्पर्धेमध्ये गव्हाण विद्यालयानेच बाजी मारली आहे.

निबंध स्पर्धेत मराठी भाषा माध्यमिक गटात दिक्षा रमेश वर्तक प्रथम, हिंदी भाषा प्राथमिक गटात रेणू प्रदीप कुमार प्रथम, उच्च माध्यमिक गटात वर्षाली तानाजी काशिद प्रथम, इंग्रजी भाषा प्राथमिक गटात रसिका संजय रौंदल प्रथम, माध्यमिक गटात श्वेता बाबासाहेब घाडगे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. विजेत्यांच्या विभागीय स्पर्धा पारगाव शाखेमध्ये बुधवारी (दि. ७) होणार आहेत.

वक्तृत्व स्पर्धेमध्येदेखील नऊपैकी सात विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून विद्यालयाचे वर्चस्व अबाधित राखले. लहान गट ५ वी ते ७ वी मराठी स्मीत कुंदन मोकल, हिंदी गौरी दुर्गाराम चौधरी, इंग्रजी अनुष्का राजेंद्र आव्हाड, माध्यमिक गट ८ वी ते १० वी हिंदी आरोही प्रमोद कोळी, इंग्रजी किरण संजय जैस्वार, उच्च माध्यमिक गट ११ वी ते १२ वी हिंदी निर्मल नागेश मंजुळकर, इंग्रजी रूपाली वैजिनाथ मंजुळकर यांनी पटकाविले.

वक्तृत्व स्पर्धेची विभाग स्तरावरील अंतिम फेरी गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये बुधवारी (दि. ७) होणार आहे.

पान १ वरून

## अटल करंडक हाच एकांकिका विश्वात एक ब्रँड

स्पर्धा वेळेत सुरू होते व वेळेत संपते. इथे वेळेची गणिते फार काटेकोरपणे पाळली जातात. आयोजकांचे जास्त कौतुक यासाठी आहे की, आपल्या आठ सेंटरपैकी सात मुंबईच्या बाहेरची आहेत. त्या सात सेंटरचे स्पर्धक इथे येतात तेव्हा त्यांची राहण्याची, जेवणाची व्यवस्था छान केलेली असते. त्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व माजी सभागृह नेते परेश ठाकूर जातीने लक्ष देत असतात. स्पर्धकांना आयोजकांकडून विश्वास मिळतो की तुम्ही या बिनधास्त तुमचे काम करा. बाकी सगळी जबाबदारी आम्ही घेतो. हा विश्वास देण्याचे काम अटल करंडकातून होते. म्हणून ही स्पर्धा वेगळी ठरते.

या स्पर्धेतून नवीन कलाकारांना संधी मिळते, पण ती त्यांना घेता आली पाहिजे. याबाबतही अटल करंडकवाल्यांचे कौतुक करावेसे वाटते, कारण नोव्हेंबरमध्ये विद्यार्थ्यांची परीक्षा सुरू होते. त्यामुळे पूर्ण स्पर्धा त्यानंतरच व्हावी असा त्यांचा कटाक्ष असतो, ज्यामुळे मुले आभ्यासाकडेही लक्ष देतील आणि त्यांना स्पर्धाही करता येईल. 'अटल' विद्यार्थ्यांना एक फ्लॅटफार्म तयार करून देते. सोशल मीडियाचा ते उत्तम वापर करतात. एकांकिका यू-ट्यूब लाईव्ह असल्याने वेळ मिळेल तेव्हा पाहता येतात. म्हणजे इंडस्ट्रीतील जे काही दिग्गज लोक कधी न कधी ती एकांकिका पाहत असतात, ती संधी तुम्हाला फार मोठं करू शकते. आपण कोणासमोर यायचे आणि जायचे, स्ट्रगल करायचा, ऑडिशन द्यायची याचा नव्या पिढीतील प्रत्येकाला प्रश्न असतो. 'अटल'चे स्पर्धक याचा विचार करीत असतीलच, पण त्यांना माहीत असते की समोर दिग्गज परीक्षक आहेत. त्यामुळे आपण योग्य ठिकाणी स्ट्रगल करतो किंवा ऑडीशन देतोय हे त्यांना माहीत असते. संधी मिळवणे फार महत्त्वाचे आहे. 'अटल' तुम्हाला ही संधी तुम्हाला मिळवून देते. म्हणूनच त्यांची टॅग लाईनदेखील 'रंगमंच आमचा, कलाविष्कार तुमचा', अशी आहे. त्यांनी तुम्हाला सगळे दिले आहे, तुम्ही फक्त येऊन परफॉर्म करायचा आहे, असे पृथ्वीक प्रताप यांनी अधोरेखित केले.

आपल्याला वाटते की मुले काय करतायत की नाही. सोशल मीडियावर कमेंट करणारे लोक म्हणतात अरे काय मराठीचे सिनेमे चालत नाहीत. काय विषय आहेत. त्या सगळ्या प्रेक्षकांनी एकांकिका पहाव्यात, म्हणजे त्यांच्या लक्षात येईल इथे मानसशास्त्रापासून प्रेमापर्यंत, जातीवाद, धर्म, भेदापर्यंत सगळे विषय मांडले जातात. एकाच साच्यात न अडकता वेगवेगळ्या विषयांना हात घालणे गरजेचे आहे, कारण त्याच पद्धतीने आमचे भविष्य आम्ही स्वीकार करणार आहोत. इथे केवळ सादरीकरणावर भर दिला जात नाही तर त्यावर सोल्युशनसाठीही आकार दिला जातो, एकांकिकेतून लोक काय घेऊन जाणार आहेत यावरही भर दिला जातो. मला असे वाटते की, वेगवेगळ्या पद्धतीने सांगणे आहे, मांडणे आहे ते जास्त महत्त्वाचे आहे, जे इथे घडते, अशा शब्दांत पृथ्वीक प्रताप यांनी सर्वंकष आढावा घेतला.

# माणगावात महोत्सवाची धूम; नागरिकांमध्ये उत्साह



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात गांधी मैदान नाणोरे फाटा येथे धीरुभाई माणगाव महोत्सवास सुरुवात झाली असून हा महोत्सव सोमवार(दि. ५)पर्यंत चालणार आहे. या महोत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद गेल्या चार दिवसांत लाभला असून विविध खेळांची साधनांबरोबरच दुकानांनी महोत्सव सजला आहे.

माणगावात दरवर्षी होणारा माणगाव महोत्सव गेली दोन वर्षे कोविड संकटामुळे होऊ शकला नाही. रायगड जिल्ह्यात कोरोना आटोक्यात आल्यानंतर शासनाने निर्बंध उठविल्याने विविध कार्यक्रम सुरू झाले असून नागरिकांमध्ये उत्साह दिसत आहे. या संकटानंतर माणगावकरांना एक विरंगुळा मिळावा व त्यांना आनंद लुटता यावा यासाठी धीरूभाई माणगाव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात एम्युझमेंट पार्क, विविध वस्तूंच्या स्टॉल, खाद्यपदार्थांची लयलूट, गमतीदार खेळांचे स्टॉल्स, दुचारी व चार चाकी गाड्यांचा लोन मेळावा असून सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रेलचेल आहे. या महोत्सवात १५ वर्षांखालील मुलामुलींना मोफत प्रवेश दिला जात आहे.

# अनधिकृत झोपड्या जमीनदोस्त

## कळंबोलीत अतिक्रमणविरोधी विभागाची धडक कारवाई

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहतीमध्ये महापालिकेच्या मोकळ्या जागांवर बेकायदा झोपड्या, टपऱ्या, दुकाने उभारल्या जातात, मात्र याबाबत आता नागरिकही सजग झाले असून याची माहिती त्वरित महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाला दिली जात आहे. दोन दिवसांपूर्वी रोडपाली जवळील मोकळ्या जागेवर बांबूची झोपडी रात्री उभारली होती. याबाबत अतिक्रमणविरोधी विभागाला माहिती देतात कळंबोली अतिक्रमणविरोधी विभागाचे प्रमुख सदाशिव कवठे यांनी रातोरात उभारलेल्या झोपडीवर रातोरात धडक कारवाई करून जमीनदोस्त केली.



कळंबोली वसाहतीत विविध ठिकाणी महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण करून झोपड्या उभारणे व बेकायदा नागरी वस्ती निर्माण करून बेकायदा अतिक्रमण केले जात आहे. महापालिकेचे अतिक्रमणविरोधी विभाग कळंबोली वसाहतीमध्ये अतिक्रमणावर कारवाई करून वसाहत सुंदर करण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र भूमाफिया या महापालिकेच्या कारवाईला न जुमानता झोपड्या उभारण्याचे काम सुरूच ठेवत आहेत. रोडपाली तलावाच्या बाजूच्या महापालिकेच्या मोकळ्या झाल्यांवर दोन दिवसांपूर्वी रात्री झोपडीसदृश्य बांबूंनी वेढलेली झोपडी निर्माण करण्याचे काम केले गेले होते. याची माहिती येथील सजग नागरिकांना मिळतात त्यांनी याबाबतची माहिती कळंबोलीतील विभाग अधिकारी सदाशिव कवठे यांना दिली.

याबाबतची गंभीर दखल घेऊन कवठे यांनी महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागातील कर्मचाऱ्यांना रातोरात कारवाई करण्यास भाग पडून रातोरात उभारण्यात आलेली झोपडी रात्रीच जमीनदोस्त केली. त्यामुळे नागरिक महापालिकेच्या अतिक्रमण विभागाला धन्यवाद देत आहेत. अशाच प्रकारचे कारवाई नाल्याच्या बाजूला उभ्या करण्यात आलेल्या बेकायदा झोपडपट्टीवर करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# भाजप भटके-विमुक्त आघाडीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात भटके-विमुक्त आघाडीची जिल्हा बैठक झाली. प्रदेश सरचिटणीस गोविंदा यल्लाप्पा गुंजाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीमध्ये धन्यवाद मोदीजी या उपक्रमाबद्दल सर्वांना माहिती दिली व जास्तीत जास्त पत्र पंतप्रधान मोदीजींना पाठविण्यासाठी गुंजाळकर यांनी आग्रह धरला. त्याचप्रमाणे भटके-विमुक्त आघाडीचे २२ डिसेंबर राज्यस्तरीय अधिवेशन नागपूर येथे होणार आहे त्या संदर्भात या अधिवेशनाला जाण्यासाठी जास्तीत जास्त पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन केले. मंडळ स्तरावरील सर्व नियुक्त करण्यात याव्यात व भटके-विमुक्त आघाडी जास्तीत जास्त मजबूत करावी यासाठी गुंजाळकर यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीसाठी प्रदेश महिला सरचिटणीस सुहासिनी केकाणे



यांच्यासह उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष बबन बारगजे यांनीही मार्गदर्शन केले.

या बैठकीसाठी खोपोली नगर परिषदेच्या माजी नगरसेविका अपर्णा सचिन मोरे व सामाजिक कार्यकर्ते सचिन मोरे हेही उपस्थित होते. भाजप उत्तर रायगड जिल्हा महिला अध्यक्ष विद्या तामखडे, त्याचबरोबर युवा संयोजक डॉ. पवनकुमार पवार, जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम आखाडे, जिल्हा कार्यकारणी सदस्य सर्वश्री रामा शेंडगे, प्रल्हाद गीते, कळंबोली मंडळ अध्यक्ष आबा घुटुकडे, पनवेल शहर अध्यक्ष गोपीनाथ मुंडे, कळंबोली मंडळ उपाध्यक्ष विठ्ठल खरात आदी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये भटके-विमुक्त आघाडीच्या उरण मंडल अध्यक्षपदी अर्जुन डोंगरे यांची नियुक्ती करण्यात आली. त्याबद्दल सर्वांनी डोंगरे यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### भिंगारी येथून गाडीची चोरी

**पनवेल :** भिंगारी येथील एमएसईबी ऑफिसच्या पाठीमागे उभी करून ठेवलेली इको गाडीची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे. रजीउद्दीन मसुद्दीन खान (वय ३९) यांनी त्यांची ग्रे रंगाची साठ हजार रुपये किमतीची (एमएच ४८ बी एच २३७७) गाडी भिंगारी येथील एमएसईबी ऑफीसच्या पाठीमागे उभी करून ठेवली होती. या वेळी अज्ञात चोरट्याने ती गाडी चोरून नेल्याने या बाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दरम्यान, पनवेल परिसरात वाहनचोरीचे प्रमाण वाढले आहे. या चोऱ्यांना आळा घालण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे.

### द्रोणागिरी नोड येथून तरुण बेपत्ता

**उरण :** येथील द्रोणागिरी नोडमधून एक व्यक्ती राहत्या



घरातून बेपत्ता झाल्याने तो हरविल्याची तक्रार न्हावा शेवा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कृष्णा प्रल्हाद गुट्टे (वय २८, रा. द्रोणागिरी नोड, उरण) असे बेपत्ता तरुणाचे नाव असून तो राहत्या घरातून ७:३० वाजता कोणासही काहीही न सांगता बाहेर पडला. घरच्यांनी वाट बघितली मात्र कृष्णा गुट्टे घरी न परतल्याने भाऊ सचिन गुट्टे यांनी तो हरविल्याची पोलीस ठाण्यात तक्रार केली. कृष्णा गुट्टेची उंची ५.८ फूट, रंग गोरा, अंगाने मध्यम, केस काळे व आखूड केस आहेत. अंगात पिवळा शर्ट व काळी पॅन्ट, पायात चप्पल आहे. हा तरुण कोणाला दिसल्यास न्हावा शेवा पोलीस ठाणे (०२२२७४७२२६४) तसेच सचिन गुट्टे (९४०४४४४४५२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### धरणा कॅम्पमधून जनरेटर बॉक्सची चोरी

**पनवेल :** तालुक्यातील धरणा कॅम्प बाटली कंपाउंड येथून लाखो रुपये किमतीच्या जनरेटर बॉक्सची चोरी झाल्याची घटना घडली आहे. संदीप वेदांत यांच्या तक्रारीनुसार धरणा कॅम्प बाटली कंपाउंड येथे बूमलिफ्टरचे दहा जनरेटर बॉक्स (किंमत एक लाख रुपये) अज्ञाताने चोरी केले ओहत. या बाबत तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

### आंबेडकरी अनुयायांना सहकार्याचे आवाहन

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंख यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित मोफत भोजन व्यवस्थेसाठी सहकार्याचे आवाहन केले आहे.दरवर्षी महेश साळुंखे पक्षाच्या माध्यमातून विविध कार्यक्रम जसे मोफत वह्यावाटप, गणवेश वाटप, रुग्णांना फळेवाटप, वृक्ष लागवड विविध सामाजिक उपक्रम राबवित असतात. यावर्षी पक्षाच्या रायगड जिल्हा शाखेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी येथील स्मारकाला अभिवादन करबासाठी पनवेलवरून जाणाऱ्या भिमभक्तांना मोफत भोजन वाटपाचा कार्यक्रम ठेवलेला आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता पनवेलमधील भिमभक्तांनी सहकार्य करव्याचे आवाहन महेश साळुंखे यांनी केलेले आहे.

# खारघरमध्ये डम्पिंग ग्राऊंडची पाहणी

## परेश ठाकूर यांच्याकडून समस्यांचा आढावा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर २७ येथे पनवेल महापालिकेमार्फत डम्पिंग ग्राऊंड तयार केलेले आहे. या डम्पिंग ग्राउंडमधून वास येत असल्याने तिथल्या परिसरातील नागरिकांना याचा त्रास होत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. त्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या डम्पिंग ग्राऊंडची पाहणी केली व परिस्थितीचा आढावा घेतला.

या पाहणीवेळी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक हरेश केणी, भाजप प्रदेश सोशल मीडिया सेलच्या सदस्य चांदनी अवघडे, हरजीत गुलाटी, सचदेव त्यागी, शशी धायगुडे आदी उपस्थित होते. या वेळी तेथील रहिवाशांनी हे डम्पिंग ग्राऊंड बंद करून ते दुसरीकडे हलवावे, अशी मागणी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडे केली आहे.

दरम्यान, पनवेल महापालिकेच्या माध्यमातून विविध विकासकामे सुरू आहेत. काही कामांमुळे स्थानिक नागरिकांना उद्भवत असतात. महापालिकेच्या माध्यमातून या समस्यादेखील सोडविण्याचे कार्य होत असते.

## नांदा सौख्यभरे!




**पुणे : सुमित्रा व्यंकटेश नायक यांची कन्या आदिती आणि माया जगदिश शर्मा यांचे सुपुत्र जयेश यांचा विवाह शनिवारी कार्ला येथे झाला. या नवदाम्पत्याला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# आंतरशालेय प्रश्नमंजुषा स्पर्धेत 'सीकेटी'चे विद्यार्थी अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड सायन्स खारघर येथे शनिवारी (दि. ३) झालेल्या आंतरशालेय सायन्स प्रश्नमंजुषा स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता बारावी सायन्सच्या दीपक माळी व सुनील चव्हाण या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. पारितोषिक रक्कम रुपये ३००० रोख व सन्मानचिन्ह देऊन या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

दोन्ही विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्याचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.













## महाअंतिम फेरी

**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने नववी राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा रंगली. या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत राज्यातून निवड झालेल्या एकांकिकांचे सादरीकरण झाले. त्यास रविवारी तिसऱ्या दिवशीही रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्याची ही चित्रमय झलक.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)











# भाजप नेत्याच्या प्रयत्नामुळे बेपत्ता मुलगी सुखरूप सापडली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खतीजा सिद्दीकी ही अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याने कळंबोलीमध्ये मोठी खळबळ माजली होती. ही बाब भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांच्या पाठपुराव्यानंतर चार दिवसांनी ही मुलगी सुखरूप सापडली.

खतीजा ही १५ वर्षांची मतिमंद मुलगी कळंबोलीमधील कृष्णा टॉवरमध्ये कुटुंबासह राहते. तेथून खतीजा बेपत्ता झाली. सगळीकडे शोधाशोध घेतल्यावर ती न सापडल्याने कुटुंबीयांनी कळंबोली पोलिसांत तक्रार दखल करण्यात आली. दोन दिवस काहीही तपास कामात प्रगती नसल्याचे पाहून कुटुंबीयांनी पत्रकार व भाजप नेते सय्यद अकबर यांच्याकडे धाव घेतली. सय्यद अकबर यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांच्या कानावर विषयाचे गांभीर्य विषद केले.



संजय पाटील यांनी त्वरित हालचाल सुरू केली. विशेष पथक नेमून तपासाला वेग दिला. खतीजाला मानसरोवर रेल्वे स्टेशनजवळ पहिल्याचे काही जणांनी सांगितले. अखेर सिवूड दारावे परिसरात सहाव्या दिवशी एक महिला रिया अब्दुल कादिर नाडर यांच्या किचन डिलाईट हॉटेल सिवूड ईस्ट येथे त्यांना खतीजा दिसली. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट पाहिली होती. त्यामुळे त्यांनी लगेचच फोनवर खतीजा सिवूडला असल्याचे पोलीस व नातेवाईकांना कळवले. पत्रकार इरफान शेख यांनी नेरूळ आणि तिथल्या व्हॉइट्सअप ग्रुपवर सर्व माहिती टाकल्याने हा प्रकार सर्वांना कळला होता.

खातीजाला पोलीस स्टेशनला आणल्यानंतर सर्वजण भावनाविवश झाले. खातीजाचे आजोबा आणी सर्वांनी सय्यद अकबर यांचे मनोमन जाहीर आभार मानले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी किचन डिलाईटच्या रिया नाडर कुटुंबाचे आभार मानले.

## संपादकीय

# समृद्धीच्या मार्गावर भरधाव...

नजिकच्या भविष्यातील महाराष्ट्राचे लोभस प्रतिकात्मक चित्र रविवारी साऱ्यांना पहावयास मिळाले. अनेक वर्षे जोपासलेले समृद्धी महामार्गाचे सुखस्वप्न साकार झाल्याचे 'याचि देही, याचि डोळा' पहावयास मिळणारी मराठी माणसांची आपली पिढी भाग्यवान म्हणावी लागेल, कारण हाच भव्य महामार्ग भविष्यातील महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखरावर नेण्यास साह्यभूत ठरणार आहे.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समृद्धी महामार्गावर रविवारी चाचणी दौड म्हणजे टेस्ट ड्राइव्ह केली. या वेळी मोटारीचे स्टिअरिंग उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हाती होते आणि त्यांच्या शेजारच्या सीटवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्थानापन्न झालेले होते. राज्यात भारतीय जनता पक्ष व शिवसेना महायुतीचे सरकार होते, त्यावेळी फडणवीस यांनी नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाचे भव्य स्वप्न पाहिले होते. हा महाप्रकल्प प्रत्यक्षात येईल असा विश्वास त्यांच्या विरोधकांना वाटत नव्हता. तरीही फडणवीस यांनी नुसतेच स्वप्नात न रमता ते साकार करण्याच्या दृष्टीने पावले उचलली, त्यावेळी एमएमआरडीएचा विभाग मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे होता. या दोघांनी मिळून समृद्धी महामार्गाच्या आराखड्यास मंजुऱ्या दिल्या. भरीव आर्थिक तरतूद केली तसेच केंद्राकडे पाठपुरावा करून आवश्यक त्या परवानग्या आणल्या. कायदेशीर बाबीदेखील शिस्तबद्धपणे निपटून काढल्या. महामार्गासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाच्या कामात काही झारीतील शुक्राचार्यांनी ना-ना अडचणी आणल्या. हितशत्रूंच्या राजकारणाची झळदेखील या महाप्रकल्पाला बसली, परंतु अडचणींचे डोंगर उद्ध्वस्त करत फडणवीस-शिंदे या शिल्पकारांनी समृद्धी महामार्गाचे स्वप्न प्रत्यक्षात आणून दाखवले. या महामार्गाचे घाईघाईत उद्घाटन करून श्रेय लाटण्याचा लाजिरवाणा प्रयत्न मध्यंतरीच्या महाविकास आघाडी सरकारने केला होता, परंतु नियतीनेच तो हाणून पाडला. समृद्धी महामार्गाचे सारे श्रेय शंभर टक्के फडणवीस-शिंदे या द्वयीलाच जाते यात महाराष्ट्राच्या मनात तिळभरही शंका नाही. ५५ हजार कोटी रुपयांचा हा महामार्ग अकरा जिल्ह्यांतील २६ तालुक्यांमधील ३९२ गावांमधून जातो. नागपूर, वर्धा, अमरावती, वाशिम, बुलढाणा, औरंगाबाद, जालना, अहमदनगर, नाशिक, ठाणे, मुंबई ही शहरे समृद्धी महामार्गामुळे जोडली जाणार आहेत. तूर्त नागपूर ते शिर्डी एवढा पट्टा वाहतुकीसाठी खुला होणार असला तरी एकदा हा प्रकल्प पुरा झाला की मुंबईतून अवघ्या आठ तासांत नागपूर गाठता येणार आहे. आज या प्रवासाला किमान चौदा तास लागतात. फडणवीस-शिंदे ही जोडी महाराष्ट्राला प्रगतीपथावर दौडविते आहे याचीच झलक रविवारी पहायला मिळाली. एकमेकांमध्ये पायपोस नसलेल्या विरोधकांना निष्कारण काव-काव करण्यापलीकडे काम उरलेले नाही. त्यांच्या कोल्हेकुईकडे सपशेल दुर्लक्ष करून शिंदे-फडणवीस सरकारचा कारभार अत्यंत शांतपणे आणि कमालीच्या वेगात सुरू आहे. समृद्धी महामार्ग हा भविष्यामध्ये शिंदे-फडणवीस सरकारच्या यशस्वितेचे प्रतीक म्हणून ओळखला जाईल यात शंका नाही. येत्या ११ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते समृद्धी महामार्गाचे थाटामाटात लोकार्पण होईल. तेव्हा या स्वप्नवत प्रकल्पाच्या कामात आपण किती खोडे घातले होते याचे स्मरण हात चोळत बसलेल्या विरोधकांनी करावे. समृद्धी महामार्गावर गाडी चालवताना हर्षोत्फुल्ल मन:स्थितीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट केले. 'अखेर तो क्षण आला, टीम महाराष्ट्राने हे घडवून दाखवले. वी डिड इट!' फडणवीस यांच्या प्रतिक्रियेतच संपूर्ण महाराष्ट्राची उचंबळून आलेली भावना व्यक्त झाली आहे.**

# श्रीवर्धनमध्ये १३पैकी पाच ग्रामपंचायती बिनविरोध

**श्रीवर्धन : भारत चोगले**

श्रीवर्धन तालुक्यात कुडकी, गुळधे, चिखलप, जसवली, दिवेआगर, मेघरे, रानवली, वाजळे, वाळवटी, शेखाडी, सर्वे साखरोणे, सायगाव असे १३ ग्रामपंचायत असुन आतापर्यंत मेघरे, गुळदे, रानवली (ग्रामविकास अघाडी), सर्वे, व गुडकी असे पाच ग्रामपंचायत हे बिनविरोध निवडून आले असुन अजून आठ ग्रामपंचायती हे निवडणूकीच्या रिंगणात आहे.

साखरोने ग्रामपंचायत ४२९ लोकसंख्या सात सदस्य एक सरपंच, शेखाडी ग्रामपंचायत ८८३ लोकसंख्या सात सदस्य एक सरपंच, सायगाव ग्रामपंचायत १२४५ लोकसंख्या सात सदस्य एक सरपंच या ग्रामपंचायतमधुन सात सदस्य हे बिनविरोध निवडून आले असून खरी रंगत ही सरपंचपदासाठी होत आहे. दिवेआगर ग्रामपंचायत ३८३९ लोकसंख्या असुन ११ सदस्यपदासाठी चुरशीची लढत पहायला मिळणार आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतीमध्ये श्रीवर्धन तालुक्याचे लक्ष लागले आहे. वाळवटी ग्रामपंचायत २३५५ लोकसंख्या नऊ सदस्य व एक सरपंचपदासाठी या ग्रामपंचायतमध्ये दोन सदस्य बिनविरोध निवडून आले असुन सात सदस्य व सरपंचपदासाठी निवडणुक रंगणार आहे. चिखलप ग्रामपंचायत १३३६ लोकसंख्या सात सदस्य व सरपंच पदासाठी निवडून, वाजंले ग्रामपंचायत २५० लोकसंख्या सात सदस्य व सरपंचपद.




आठ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सगळ्याच पक्षाने आपली कंबर कसली आहे. काही ग्रामपंचायती ह्या कार्यकर्तेच्या अगदी प्रतिष्ठेच्या मानल्या जात असल्यामुळे निवडणुकीत रंगत बघायला मिळणार आहे. श्रीवर्धन तालुक्यात काही ठिकाणी भाजप व बाळासाहेबांची शिवसेना तर काही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व उध्दव बाळासाहेब ठाकरे अशी युती पहायला मिळाली आहे.

शिंदे गटाने या निवडणुकीत अधिक लक्ष दिल्यामुळे तसेच शिंदे गटाचे प्रत्तोत महाडचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी श्रीवर्धन तालुक्यात अधिक दौरे व कार्यकर्तेची भेटीगाठी घेत आहेत. त्यामुळे भाजप व बाळासाहेबांची शिवसेना पक्ष वाढत असल्याने याचा फायदा ग्रामपंचायतीमध्ये शिंदे गटास नक्कीच होणार यात अजिबात शंका नाही. सध्या राज्यातील राजकीय परिस्थिती पाहत मतदार संघातसुध्दा बद्दल दिसुन येईल, कारण मतदारसुद्धा संभ्रमात पडला आहे. त्यामुळे जनता कोणाच्या बाजुने कौल देईल हे आज तरी सांगता येणार नाही.

श्रीवर्धन तालुक्यातील मात्र राजकीय वातावरण हे तापलेले असुन कार्यकर्ते आपआपली प्रतिष्ठा राखण्यासाठी पायाला भिंगरी बांधुन मतदारांची मनधरणी उमेदवारी अर्ज भरायचा आधीपासूनच पक्षाची बांधणी करत आहे. काही ग्रामपंचायतींमध्ये यावेळेस नक्कीच बद्दल घडुन आण्यासाठी रस्सीखेच दिसुन येत आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आय काँग्रेस व उध्दव बाळासाहेब ठाकरे यांची युती असल्याने हेही पक्ष आपल्यापरीने निवडणुकीसाठी प्रयत्न करीत आहेत.

# माती : आरोग्यदायक अन्ननिर्मितीचा पाया

माती हा अत्यंत महत्त्वाचा पण नेहमीच दुर्लक्षित राहिलेला स्त्रोत आहे. या घटकाकडे जगभरातील लोकांचे लक्ष वेधणे तसेच मातीच्या संवर्धनाची असलेली गरज याबाबत जनजागृती करण्यासाठी ५ डिसेंबर हा जागतिक मृदा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.



आरोग्यदायक माती हा आरोग्यदायक अन्न निर्मितीचा पाया आहे. विविध पिके आणि शेती यांचा पाया माती आहे. अन्नधान्याच्या ९० टक्के गरजा मातीद्वारेपूर्ण होतात. जंगले वाढविण्यासाठी मातीचीच आवश्यकता असते. पृथ्वीचा एक चतुर्थांश भाग विविध जीवांनी व्यापला असून ही जैव विविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा आहे. मातीमध्ये पाणी अडविण्याची, साठविण्याची आणि शुद्ध करण्याची क्षमता आहे. माती अमूल्य आहे. अन्न, वस्त्र व निवारा या आपल्या मुलभूत गरजा मातीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

माती कारखान्यांत तयार होत नाही. माती तयार होण्यासाठी हजारो वर्षांचा कालावधी लागतो. ऊन, वारा, पाऊस व पाण्याचा प्रवाह अशा विविध गोष्टींचा परिणाम खडकांवर झाला. खडकांची झीज होऊन माती तयार झाली. लाखो वर्षे ही प्रक्रिया सुरू होती. साधारण १ सेंमी. मातीचा थर तयार होण्यासाठी हजारो वर्ष लागतात. या मातीमध्ये मृत प्राण्यांचे अवशेष प्राण्यांची विष्टा, कुजलेल्या वनस्पतींचे अवशेष असतात. सेंद्रिय पदार्थ व खनिज पदार्थ अशा दोन प्रकारच्या पदार्थांनी माती बनते. अनेक मातीचे कण मिळून जमीन तयार होते. जमिनीतील १० ते १५ सेंमी. मातीची थर हा पृथ्वीवरील जीवांच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा भाग असतो.

शेत मशागतीच्या चुकीच्या पद्धती, बेसुमार जंगलतोड, अनिर्बंध चराई, वारा, जोराचा पाऊस, इ. कारणांमुळे जमिनीची धूप होते. हजारो वर्षांनी बनलेला हा मातीचा थर नष्ट व्हायला अत्यल्प कालावधीही पुरेसा ठरतो. जमिनीच्या धुपीमुळे सुपीक माती वाहुन जाते. सुपीक जमिनीबरोबर पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाळू, खडकांचे बारीक तुकडे वाहत येतात व सुपीक भागात पसरतात. यामुळे सुपीक जमीन नापिक होण्याची शक्यता असते. मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानातून कितीही प्रगती साधली तरी एकदा नष्ट झालेली माती पुन्हा निर्माण करू शकत नाही हे वास्तव आहे. यासाठी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. जमीन हा मर्यादीत स्वरुपाचा नैसर्गिक स्त्रोत असल्यामुळे त्याची योग्य जोपासना करुन भविष्यातील गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीचे आरोग्य सुस्थितीत ठेवणे गरजेचे आहे. यासाठी स्थानिक गरजेनुसार योग्य व्यवस्थापन पद्धतीचे अवलंबन करण्याची गरत आहे. जमिनीच्या प्रकारानुसार पिकांची निवड, माती परीक्षणानुसार खतांचा संतुलित वापर, पिकांची फेरपालट, सेंद्रिय खतांचा नियमित वापर, इत्यादींचा वापर करून जमिनीची सुपिकता टिकवुन ठेवणे आणि प्रति हेक्टरी उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे.

भविष्यात जमीन आरोग्याचे निदान करण्यासाठी माती परीक्षण तंत्रज्ञानाचा वापर अपरीहार्यच होणार असुन या पुढील काळात जमिनीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास त्यांचे गंभीर परीणाम फक्त शेतीवरच न दिसता मानवी शरीर आणि प्राणी इत्यादींना सुद्धा जाणवणार आहेत. ते लक्षात घेऊनच केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने राज्यात मृद आरोग्य पत्रिका वितरण कार्यक्रम सन २०१५-१६ पासून राबविण्यांत येत आहे. या कार्यक्रमात टप्प्याटप्प्याने आगामी दोन वर्षाच्या कालावधीमध्ये सर्व गावांची निवड करुन सर्व शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची आरोग्य पत्रिका देण्यात येत आहे. मृद आरोग्य पत्रिकेमध्ये जमिनीतील उपलब्ध अन्न द्रव्यांचे प्रमाण समजणार आहे. या बाबतच्या माहितीचा उपयोग शेतकऱ्यांना विविध पिकांना योग्य प्रमाणात संतुलीत खते देण्याकरीता होणार आहे. माती परीक्षणानुसार खताचे व्यवस्थापन केल्यास जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवण्यास व पिकांचे उत्पादन वाढण्यास व खर्चाची बचत होण्यास मदत होणार आहे.

सर्व शेतकरी बंधुना विनंती आहे की, आपण आपल्या शेत जमिनीचे नियमीत माती परिक्षण करुन आपल्या जमिनीची सुपिकता जाणुन घ्यावी व त्यानुसारच पिकाना खताची मात्रा द्यावी जेणे करून जमिनीचे आरोग्य अबाधित ठेवुन आपणास आधिक उत्पादन घेत येईल. व जमीनीच्या आरोग्य बरोबरच मानवी आरोग्याचे ही जतन होईल.

**-सचिन बऱ्हाटे, जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी, जळगाव**



## बदलते तंत्रज्ञान

# आधार कार्ड असल्यास काही तासांत मिळेल पॅनकार्ड

पॅन कार्ड ही आपल्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट बनली आहे. आयकरापासून प्रत्येक गोष्टीत पॅनकार्डचा वापर केला जातो. दरम्यान, जर तुम्ही अद्याप पॅन कार्ड अजून बनवून घेतले नसेल तर आता तुम्हाला अजिबात काळजी करण्याची गरज नाही.आता आधारच्या माध्यमातून डिजिटल पॅनकार्ड काही तासांत सहज तयार होणार आहे. त्यामुळे लोकांना पॅनकार्डसाठी फार काळ वाट पाहावी लागणार नाही. फार कमी जणांना माहिती आहे की, आधार कार्डप्रमाणेच पॅन कार्ड देखील ऑनलाइन मिळते. तुम्ही ते सहजपणे डाउनलोड करू शकता. फिनो पेमेंट्स बँकेने एक नवीन सेवा सुरू केली आहे, ज्याद्वारे आता काही तासांत डिजिटल पॅन कार्ड मिळू शकते. फिनो पेमेंट्स बँकेने सुरू केलेल्या नवीन सेवेच्या मदतीने युजर्स काही तासांत आधार-आधारित प्रमाणीकरणाद्वारे नवीन पॅन कार्डची डिजिटल व्हर्जन मिळवू शकतात. बँकेने भारतामध्ये, विशेषतः ग्रामीण भागात पॅन कार्ड जारी करण्याच्या सेवांचा विस्तार करण्यासाठी प्रोटीन ईगोव टेक्नॉलॉजीजसोबत करार केला आहे.



फिनो बँक केंद्रांच्या मदतीने आधार प्रमाणीकरणानंतर कोणतेही युजर्स पॅन कार्ड मिळवू शकतात. यासाठी तुम्हाला वेगळे कागदपत्र सादर करण्याची गरज नाही. याशिवाय यूजर्सना डिजिटल आणि फिजिकल स्वरूपात पॅन कार्ड निवडण्याचा ऑप्शनही दिला जाईल. फिनो बँकेने म्हटले आहे की, डिजिटल व्हर्जन पॅन कार्ड किंवा ई-पॅनचा अर्ज केल्यानंतर काही तासांतच युजर्सच्या ईमेल आयडीवर पाठवले जाईल तसेच ई-पॅन कार्ड हे फिजिकल पॅन कार्डइतकेच वैध आहे आणि ते सर्वत्र वापरले जाऊ शकते, परंतु तरीही तुम्हाला फिजिकल पॅन कार्ड हवे असल्यास फिनो बँकेच्या या सेवेच्या मदतीने तुम्हाला चार ते पाच दिवसांत तुमचा आधार क्रमांक मिळेल तसेच पॅनकार्ड दिलेल्या पत्त्यावर पाठवले जाईल.

**अशी मागवा पॅन कार्डची हार्ड कॉपी**

तुम्हाला पॅन कार्डची हार्ड कॉपी मागवायची असेल, तर इन्कम टॅक्सच्या अधिकृत वेबसाइट https://www.onlineservices.nsdl.com/paam/ReprintEPan.html ला भेट द्या. याठिकाणी तुमचे डिटेल्स भरल्यानंतर, तुम्ही तुमच्या रजिस्टर्ड पत्त्यावर पॅन कार्डची हार्ड कॉपी मिळवू शकता. आणखी एक गोष्ट, देशात पॅन कार्ड मिळवण्यासाठी तुम्हाला ९३ रुपये + १८ टक्के जीएसटी आणि ११० रुपये शुल्क द्यावे लागेल. जर तुम्हाला परदेशात पाहिजे असेल तर तुम्हाला १०११ रुपये शुल्क द्यावे लागेल.

# आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू शिखर धवन

**निमित्त**

शिखर धवन हा भारतीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू आहे, जो देशांतर्गत क्रिकेटमध्ये आणि सध्या आयपीएलमध्येही दिल्ली कैपिटल्स साठी खेळतो. शिखर धवन भारतीय क्रिकेट संघाचा डाव्या हाताचा सलामीचा फलंदाज आहे आणि अधूनमधून उजव्या हाताचा ब्रेक गोलंदाजदेखील आहे. सध्या तो भारतीय संघासाठी सलामीवीराची भूमिका साकारत आहे. शिखर धवनचा आज वाढदिवस आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त जाऊन घेऊया त्याच्याबद्दल या लेखातून...



शिखर धवन यांचा जन्म ५ डिसेंबर १९८५ रोजी दिल्ली येथे झाला. त्यांच्या आईचे नाव सुनैना धवन आणि वडिलांचे नाव महेंद्र पाल धवन आहे. त्याला एक बहीण आहे, ज्यांचे नाव श्रेष्ठा आहे. त्याची पत्नी आयशा एक ऑस्ट्रेलियन नागरिक आहे, जी त्याच्यापेक्षा १० वर्षांनी मोठी आहे. ३० ऑक्टोबर २०१२ रोजी त्यांचे लग्न झाले होते.

भारतीय सलामीवीर फलंदाज शिखर धवनने वयाच्या १२ व्या वर्षी क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली. तारक सिन्हा असे त्याच्या प्रशिक्षकाचे नाव आहे. त्याने सुरुवातीचे क्रिकेट प्रशिक्षण आपल्या प्रशिक्षकाच्या देखरेखीखाली सोनेट क्लबमध्ये केले. प्रशिक्षक तारक सिन्हा यांनी आतापर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेल्या अशा १२ खेळाडूंना प्रशिक्षण दिले आहे. कारकिर्दीच्या सुरुवातीला शिखर हा विकेटकीपर फलंदाज होता. पण जसजसा वेळ गेला तसतसे त्याने फलंदाजी, फिल्डिंग आणि फिटनेसवर आपले पूर्ण लक्ष केंद्रित केले.

शिखर धवनचे २०१२ साली लग्न झाले होते. त्याची पत्नी त्याच्यापेक्षा १० वर्षांनी मोठी आहे. ती मूळची ऑस्ट्रेलियाच्या मेलबर्नची असून तिचे नाव आयशा मुखर्जी आहे. यापूर्वी ती बॉक्सर होती. माजी भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंगने आयशाची ओळख शिखर धवनशी केली. जेव्हा आयशा आणि शिखर यांचे लग्न झाले तेव्हा आयशा आधीच २ मुलींची आई होती. यानंतर २०१४ साली शिखर आणि आयशाला मुलगा झाला. ज्याचे नाव त्याने झोरवार धवन असे ठेवले. शिखर धवन जेव्हा मैदानावर आनंद व्यक्त करतो तेव्हा कधीकधी त्याला मिश्या ताठ करणे आवडते.

पश्चिम विहार, दिल्ली येथील सेंट मार्क्स सिनिअर सेकण्डरी स्कूलमधून शिखरने शिक्षण पूर्ण केले. वयाच्या १२ व्या वर्षापासून सॉनेट क्लब मध्ये प्रशिक्षक तारक सिन्हा यांच्याकडून शिखरने क्रिकेटचे धडे गिरवण्यास सुरुवात केली. तारक सिन्हा ह्यांनी १२ आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू घडवले आहेत. अकादमीमध्ये सुरुवातीला शिखर यष्टीरक्षण करत असे.

शिखर सुरुवातीला दिल्लीच्या १६ वर्षाखालील संघाकडून १९९९ मध्ये विजय मर्चेट ट्रॉफीमध्ये खेळला. ऑक्टोबर २००२ मध्ये कूच बिहार ट्रॉफीमध्ये दिल्लीच्या १९ वर्षाखालील संघामध्ये शिखरची निवड झाली. त्यामध्ये शिखरने तेजस्वी कामगिरीची पुनरावृत्ती करत ८ सामन्यांमध्ये ५५. ४२ सरासरीने ३८८ धावांचा पाऊस पाडला. ऑक्टोबर २०१० मध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्ध एक दिवसीय मालिकेसाठी दुसऱ्या फळीतील संघामध्ये पहिल्यांदाच १४ खेळाडूंमध्ये शिखरची निवड झाली.

शिखर धवनने कसोटी पदार्पण मोहाली येथे १४ मार्च रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध केले. हाताच्या दुखापतीमुळे भारताच्या दुसऱ्या डावात शिखर फलंदाजी करू शकला नाही. ६ गडी राखून भारताने विजय मिळवला आणि शिखर धवनला सामनावीर घोषित करण्यात आले.नागपुरमध्ये झालेल्या सहाव्या सामन्यातशिखर धवनने आणखी एक शतक फटकावले ते त्याचे चौथे शतक होते. नोव्हेंबर २०१३ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध तिसऱ्या एक दिवसीय सामन्यामध्ये शिखर धवनने विजयश्री खेचून आणणारी ११९ ही धावसंख्या धावफलकावर लावली. कानपूर येथे झालेल्या सामन्यात शिखर धवन सामनावीर ठरला. १ नोव्हेंबर २०१७ रोजी शिखर धवनने न्यूझीलंड विरुद्ध ५२ चेंडूमध्ये ८० धावा केल्या. तो त्याचा टी-२० मधील सर्वाधिक स्कोअर होता. १७ डिसेंबरला धवनने श्रीलंकेविरुद्ध खेळतांना त्याचे १२ वे एक दिवसीय सामन्यातील शतक झळकावले आणि ४००० धावा सर्वात जलद गतिने करणारा तो पाचवा फलंदाज ठरला. त्याला 'मॅन ऑफ द सिरीज' पुरस्कार मिळाला.शिखरची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांची यादी न संपणारी आहे. त्याचे गब्बर हे टोपण नाव त्याची बॅट सार्थ करून दाखवते. शिखर धवनच्या उत्तुंग कारकिर्दीबद्दल अभिनंदन आणि शुभेच्छा!

**(साभार : मराठीमी डॉट कॉम)**

**क्लिक...क्लिक...!**



**सोलापूर : पंढरपुरी म्हैस ही एक भारतीय म्हशीची जात आहे. या जातीच्या म्हशी सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, बेळगाव येथे आढळतात. खांद्यापर्यंत पोहचणारी लांब व पिळवटलेली शिंगे हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. हे चित्र आहे सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यात या म्हशींना चरायला नेत असतानाचे.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# केळीच्या सालीचे अनेक आश्चर्यकारक फायदे



पोटॅशियम आणि फायबरने युक्त केळी खायला चविष्ट असते, त्यामुळे हे लहान मुलांचेही आवडते फळ आहे. त्याचबरोबर काही लोक वजन वाढवण्यासाठी दुधासोबत केळीचे सेवन देखील करतात. केळीच्या फायद्यांविषयी अनेकांना माहिती आहे, पण याच्याशी संबंधित एका गोष्टीबद्दल फार कमी लोकांना माहिती आहे. अनेकदा लोक केळी खाल्ल्यानंतर त्याची साल डस्टबिनमध्ये टाकतात. तुम्हीही हे करत असाल तर भविष्यात चुकूनही हे करणार नाही.

हा लेख वाचल्यानंतर तुम्हीही मान्य कराल की किती मोठी चूक तुम्ही बराच काळ करत होता. वास्तविक, केळीचे फायदे जेवढे केळीच्या सालीचे आहेत तेवढेच फायदे पण फार कमी लोकांना माहिती आहेत. हे वेगवेगळ्या प्रकारे वापरले जाऊ शकते. कसे ते जाणून घेऊया

आपण घरी एक उत्कृष्ट हेअर मास्क तयार करू शकता.केसांच्या वाढीसाठी आणि पोषणासाठी हेअर मास्क वापरतात. तुम्हीही हेअर मास्क वापरत असाल तर महागड्या उत्पादनांवर खर्च करण्याऐवजी तुम्ही हेअर मास्क घरीच तयार करू शकता. होय, केळी बारीक करून हेअर मास्क तयार करता येतो. केळीच्या सालीमध्ये असलेले पोषक घटक केसांना चमक आणि चांगली वाढ देतात.

केळीच्या सालीमुळे दातांची चमक वाढेल. काही वेळा रोज दात घासल्यानंतरही ते पिवळे पडू लागतात. केळीच्या सालीचा वापर दातांना पॉलिश करण्यासाठीही करता येतो. पिवळ्या दातांवर केळीची साल चोळल्याने पांढरा प्रभाव पडतो.

फेस पॅकमध्ये केळीची साल वापरा. ज्याप्रमाणे केळीची साल हेअर मास्कसाठी उपयुक्त आहे, त्याचप्रमाणे केळीच्या सालीमध्ये असलेले अँटी-ऑक्सिडंट्स आणि अँटी-मायक्रोबियल गुणधर्म तुमच्या चेहऱ्याच्या त्वचेला टवटवीत करण्यासाठी प्रभावी आहेत. चेहऱ्यावरील सुरकुत्याची समस्या दूर करण्यासाठी तुम्ही केळीच्या सालीचा फेस पॅकही तयार करू शकता.

# कोविड काळातील आरोग्य सुविधा गायब

## हिशेब मांडताना अधिकाऱ्यांना अडचणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कोरोना काळात शासनातर्फे आरोग्य सुविधा उभारण्यावर भर देण्यात आला. प्रत्येक तालुकास्तरावर आरोग्य केंद्र सुरू करण्यात आले. विलगीकरणात वाढीव खाटा, कोविड केंद्रात विशेष खाटा, व्हेंटिलेटर सुविधेसह ऑक्सिजन पुरवठ्याची यंत्रणा देण्यात आल्या. यासाठी कोट्यवधींचा खर्च करण्यात आला, मात्र आता दोन वर्षांनंतर ही आरोग्य सुविधा कुठे गेली, याचा लेखाजोखा संबंधित अधिकाऱ्यांनाही मिळवण्यात अडचणी येत आहेत.

रायगड जिल्ह्यात कोविडसाठी ३३ राखीव आरोग्य केंद्र, तर १७ राखीव केंद्र सुरू करण्यात आली होती. अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात १० व्हेंटिलेटरसह जिल्हाभरात १४० व्हेंटिलेटर देण्यात आले होते. सरकारी निधीबरोबरच जिल्ह्यातील विविध कंपन्यांनी यासाठी भरीव सीएसआर निधी दिला होता. कालांतराने रुग्णसंख्या कमी होऊ लागल्यावर गृहविलगीकरणात उपचार करून घेण्याची मुभा देण्यात आल्याने टप्प्याटप्प्याने सर्व सुविधा बंद करण्यात आल्या. त्यामुळे कोट्यवधींच्या



अद्ययावत आरोग्य यंत्रणांचे काय झाले, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. याचे स्पष्ट उत्तर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागासह जिल्हा शल्यचिकित्सकांकडेही नाही.

दोन्हीही विभागातून एकमेकांवर जबाबदारी ढकलण्यात येत आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात खरेदी केलेल्या साहित्याचे पुढे काय झाले, याचे कोणतेही स्पष्ट उत्तर संबंधित अधिकाऱ्यांकडे नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

**प्राथमिक आरोग्य केंद्रांत आल्यानंतर तपासणीनंतर बाधित आढळणाऱ्या रुग्णांना गृहविलगीकरणात पाठविण्यात येते, अशा बाधितांची सध्याची संख्या खूपच कमी आहे. त्यांना रुग्णालयात किंवा विलगीकरणात दाखल करून घेण्याची गरज नसल्याने कोविड केंद्र बंद केले आहेत, मात्र येथील साहित्याची जबाबदारी आमच्याकडे नसल्याने त्याचे काय झाले हे आम्हाला माहिती नाही. याबाबतची माहिती जिल्हा शल्यचिकित्सकांकडे असावी.**

**–डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी**

**पूर्वी प्रसुती कक्ष, मेडिकल वॉर्ड, सर्जिकल वॉर्डमध्ये वापरात असणाऱ्या खाटा कोविडसाठी वापरण्यात आल्या, आता त्या पुन्हा त्या–त्या वॉर्डमध्ये वापरल्या जात आहेत. तालुका स्तरावरील साहित्याची माहिती नाही, तर व्हेंटिलेटरसारखी उपकरणे तज्ज्ञ डॉक्टर नसल्याने फारशी वापरात नाहीत.**

**–डॉ. सुहास माने, जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड**

## शिक्षक परिषदेच्या प्रयत्नांना यश

# ५० टक्के पदोन्नतीने केंद्रप्रमुख पदे भरण्यास मान्यता

**अलिबाग : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभागाने केंद्रप्रमुख पदे ५० टक्के पदोन्नतीने व ५० टक्के मर्यादेत विभागीय स्पर्धा परीक्षांद्वारे भरण्यासाठी मान्यता दिली आहे. तसा शासन आदेशदेखील पारित केलेला आहे. महाराष्ट्र शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या माध्यमातून गेली तीन वर्ष सातत्याने यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा सुरू होता.

ग्रामविकास विभागाच्या १० एप्रिल २०१४च्या आदेशानुसार नुसार कार्यरत केंद्रप्रमुख पदे ४० : ३० : ३० या रेषोप्रमाणे भरण्याचे आदेश काढण्यात आल होते. ४० टक्के कार्यरत शिक्षकांची सेवाज्येष्ठता ३० टक्के विभागीय स्पर्धा परीक्षा व ३० टक्के सरळ सेवा परीक्षा अशा पद्धतीने भरण्यासंदर्भात ग्रामविकास विभागाने आदेश सूचना निर्गमित केली होती. शालेय शिक्षण विभागाने सन २०१८मध्ये यासंदर्भात अधिकृत अधिसूचना जाहीर करून परीक्षेचा अभ्यासक्रम निश्चित केला होता. त्याला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाने आक्षेप नोंदवलेला होता.

परिषदेचे संस्थापक आमदार संजय केळकर, आमदार डॉ. रणजीत पाटील, आमदार नागो गाणार यांनी विधानसभेत व विधान परिषदेमध्ये तारांकित प्रश्न उपस्थित करून २०१२पासून रिक्त असणारी केंद्रप्रमुख पदे सेवाज्येष्ठतेने भरण्यासंदर्भात सभागृहाचे लक्ष वेधले होते. राज्यात एकूण चार हजार ८६० केंद्रप्रमुख पदांपैकी ७० टक्के पदे रिक्त असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. अनेक केंद्राचा पदभार उपशिक्षकांकडे तर पदवीधर शिक्षकांकडे देण्यात आलेला आहे.

२१ नोव्हेंबर २०२१ रोजी शिक्षण आयुक्त पुणे यांच्या कार्यालयासमोर राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे संस्थापक आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक परिषदेने लाक्षणिक उपोषण केलेले होते. २० फेब्रुवारी २०२२ रोजी ग्रामविकास विभागाचे अप्पर सचिव राजेश कुमार यांची भेट घेऊन त्यांना यासंदर्भात निवेदन देऊन चर्चा केली होती. २८ फेब्रुवारी २०२२ रोजी शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांची पुणे येथे भेट घेऊन त्यांनाही निवेदन दिले होते. माजी शिक्षण संचालक टेमकर यांनी शासनाला ५० टक्के पदोन्नतीने व ५० टक्के व विभागीय स्पर्धेने केंद्रप्रमुख पदे भरण्यासंदर्भात सुचवलेले होते. शालेय शिक्षण सचिव देओल यांची भेट घेऊन शिक्षक संघटनेने त्यांनाही यासंदर्भात केंद्र प्रमुखाची ७० टक्के पद रिक्त असल्याचे निदर्शनास आणून दिलेले होते.

राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन व शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांची त्यांची मुंबई येथे भेट घेऊन यांच्यासोबत संघटनेने सकारात्मक चर्चा केली होती. संघटनेने सातत्याने पाठपुरावा केल्याने अखेर १ डिसेंबर २०२२ रोजी शिक्षण विभागाने ५० टक्के पदोन्नतीने व ५० टक्के विभागीय स्पर्धा परीक्षेने पद भरण्याचे निश्चित केलेले आहे. याबद्दल राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी आभार मानले आहेत.

# चालकाला डुलकी लागल्याने बोरघाटात कार उलटली

## एकजण ठार; तिघे किरकोळ जखमी

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील ढेकू गावच्या हद्दीत रविवारी (दि. ४) पहाटे २ वा. सुमारास चालकाला डुलकी लागल्याने कार उलटून अपघात झाला. या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून तिघे किरकोळ जखमी झाले आहेत.पुणे येथून खासगी कार्यक्रम उरकून कांजूरमार्ग येथील पाटील कुटुंब मुंबईस जात होते. पाटील यांना डुलकी लागली असता त्यांच्या ताब्यातील कॉलिस (कार क्र. एमएच ०२ एके ५२३२)वरील



नियंत्रण सुटल्याने क्वालीस गाडी डाव्या बाजूला रेलिंगला धडकली आणि पलटी झाली. या. अपघातामध्ये चालक विजय मंगल पाटील, ५७ रा. कांजूरमार्ग, मुंबई जागीच ठार झाले, तर त्यांची पत्नी, मुलगा व मुलगी सुखरूप असून किरकोळ जखमी झाले. जखमींना तातडीने खोपोली येथील डॉ. जाखोटिया रुग्णालयात उपचार करण्यात आले.

## टेम्पो ३० फूट दरीत कोसळला

पुण्याहून बदलापूरकडे निघालेला मालवाहू टेम्पो बोरघाटातून मेकॅनिक पॉईंटजवळ रविवारी (दि. ४) दुपारी १.४५ वा. सुमारास चालकाचे नियंत्रण सुटल्याने ३० फूट दरीत कोसळला. या अपघातात तिघे जण जखमी झाले आहेत.

चालक शाहरुख कुरेशी (वय २८, रा. खडकी बाजार पुणे) याचे टेम्पोवरील नियंत्रण सुटले आणि टेम्पो तीव्र वळणावर रस्त्यालगतचा असलेला सुरक्षाकठडा तोडून ३० फूट खोल दरीत कोसळला. झाडांमुळे टेम्पो अडकला अन्यथा अजून खोल दरीत कोसळला असता. टेम्पोमध्ये चालकासह प्रवास करणारा अबूबकर कुरेशी (वय ३२, रा. खडकी बाजार पुणे) आणि महिला वर्जेनिया फिलीप टाकार (वय ५३ , रा. हिंजवाडी पुणे) असे तिघे जण अडकले होते. याची माहिती मिळताच बोरघाट पोलीस, प्रवासी तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेच्या सदस्यांनी अडकलेल्या प्रवाशांना टेम्पोमधून बाहेर काढत तातडीने खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल केले. खोपोली सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश कळसेकर पुढील तपास करीत आहेत.

# बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पाळीव जनावरांची भरपाई द्यावी

## साळाव ग्रामपंचायतीतर्फे वन अधिकाऱ्यांना निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

साळाव येथे बिबट्याचा हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पाळीव प्राण्यांची नुकसान भरपाई देण्याबाबत ग्रामपंचायतीतर्फे सरपंच निलम पाटील यांनी वनक्षेत्रपाल यांना एक निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, गेल्या १५ ते २० दिवसांपासून साळावमध्ये बिबट्याचा वावर झाल्याचे दिसून येत आहे, नुकतेच कृष्णा रामा पाटील यांच्या म्हैशीच्या रेडकूंवर बिबट्याने हल्ला करून जंगलात घेऊन गेला, तसेच पठारावरील अदिवासी बांधवांच्या बकऱ्या गोठ्यातून घेऊन गेला. या घटना पाहता नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे, त्यामुळे भविष्यात मनुष्यहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याचा गांभिर्याने विचार करून योग्य उपाययोजना करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. ज्यांचे पाळीव प्राणी मृत्यूमुखी पडलेले आहेत, त्यांना वनखात्याकडून तातडीने नुकसान भरपाई मिळण्याची मागणीसुद्धा या निवेदनातून करण्यात आली आहे.

# श्रीवर्धनमधील आंबेली आदिवासीवाडी येथे मतदार नोंदणी शिबिरास प्रतिसाद

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या आदेशाने व उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार नोंदणी अधिकारी १९३–श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ श्रीवर्धन अमित शेडगे, तहसीलदार सचिन गोसावी यांच्या पुढाकारातून शनिवारी (दि. ३) आदिवासी



मतदार बांधवांसाठी आंबेली आदिवासीवाडी येथे विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरासाठी निवडणूक महसूल सहाय्यक, तलाठी तळा, नागपंचायत लिपिक उपस्थित होते. या शिबिरात नमुना नं.६ चे एकूण १८ अर्ज भरून घेण्यात आले.

# जोहे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सायन्स लॅबचे उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज जोहे येथे लायन्स क्लब ऑफ बॉम्बे बाबूलनाथकडून सायन्स लॅबचे सर्व साहित्य भेट देण्यात आले. लायन्स प्रेसिडेंट कमल मेहरजिना यांच्या हस्ते सदर लॅबचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी कश्मीरा चँगकक्ती, पेरीन हकीम, रशना दस्तुर, पेरसी कायकोबद, झेनोबिया कायकोबद, रोशनी केलेवाला, मेहरू वंडरीवाला, टीना मेहता, सोरब बुलसरा, अकील हाफिज, संस्थेचे विभाग प्रमुख प्रकाश हाके, एस. आर. बेडगे, संजय महाजन, चेअरमन अशोक



मोकल, रा. ल. पाटील, डॉ. अनंत पाटील, पेण प्राचार्य बाळासाहेब दुधाळे, जोहे मुख्याध्यापक एस. आर. पाटील, वावोशी मुख्याध्यापक सुरेश पाटील, स्कुल कमिटी सदस्य गोपीनाथ मोकल, देवा पेरवी, लव्हेद्र मोकल, भगवान पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना लायन्स क्लबचे प्रेसिडेंट कमल मेहरजिना यांनी सांगितले की, आपल्या आवडीच्या क्षेत्रात कल्पकता वापरून नवीन संशोधन करण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन करत विद्यार्थ्यांसह शाळेसाठी यापुढे कायम सहकार्य करणार असल्याचे आश्वासन कमल मेहरजिना यांनी दिले. उपस्थित विद्यार्थ्यांनी लायन्स क्लबच्या सदस्यांना विविध प्रात्यक्षिके दाखविली.

आमच्या शालेय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान या विषयातील नव्या संकल्पना रुजविणे व त्यांच्यातील कौशल्य विकसित करण्यासाठी ही आधुनिक सायन्स लॅब उभारण्यात आली. त्याचा फायदा शाळेतील विद्यार्थ्यांना यापुढे नक्की होईल, असे मुख्याध्यापक एस. आर. पाटील यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारांची भाऊगर्दी

## मुरूडमध्ये पाच ग्रामपंचायतींच्या सदस्यपदासाठी ११६, तर सरपंचपदाकरिता २५ अर्ज

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील काकळघर, वावडुंगी, वेळास्ते, तेलवडे, कोर्लई या पाच ग्रामपंचायतींसाठी सदस्यपदाकरीता ११६ तर सरपंचपदाकरीता २५ अर्ज दाखल करण्यात आले.

शेवटच्या दिवशी शुक्रवारी (दि. २) अर्ज दाखल करण्याची मुदत सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत वाढविण्यात आली होती. त्याबरोबर ऑफलाईन उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुभा प्रशासनाने दिली होती. त्यामुळे उमेदवारांना फायदा झाला. गर्दी वाढेल त्यामुळे तहसीलदार तथा निवडणूक निर्णय अधिकारी रोहन शिंदे व नायब तहसीलदार अमित पुरी यांच्याकडून दक्षता घेण्यात आली होती. वावडुंगी ग्रामपंचायतीकरिता सदस्यपदासाठी सात तर सरपंचपदाकरीता दोन उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. काकळघर ग्रामपंचायतीमधून सदस्यपदाकरिता ३३ तर सरपंचपदाकरीता पाच अर्ज दाखल करण्यात आले.

वेळास्ते ग्रामपंचायत सदस्यपदाकरीता ११ तर सरपंचपदाकरीता तीन अर्ज दाखल करण्यात आले. तेलवडे ग्रामपंचायतीमधून सदस्यपदाकरीता चार उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. कोर्लई ग्रामपंचायतीमधून सदस्यपदाकरीता ३० तर सरपंचपदाकरीता पाच अर्ज दाखल करण्यात आले. एकूण पाच ग्रामपंचायतींमधील सदस्यपदासाठी ११६ तर सरपंचपदाकरीता २५ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

## पेणमध्ये २६ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी ११०, तर सदस्यपदासाठी ५८० अर्ज

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील २६ गामपंचायतीमध्ये सरपंचपदासाठी ११० तर सदस्यांसाठी ५८० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. तहसील कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार, पाटणोली व मुंढाणी या ग्रामपंचायतींमध्ये एकच उमेदवारी अर्ज आल्याने या दोन्ही गामपंचायतीत सरपंचपद बिनविरोध झाले आहेत.

करोटीमध्ये सरपंचासाठी दोन तर सदस्य १५ अर्ज, आंबिवलीत सरपंचासाठी दोन तर सदस्य १५ अर्ज, सावरसईत सरपंचासाठी तीन अर्ज तर सदस्य १९ अर्ज, वाशिवलीत सरपंचासाठी दोन अर्ज तर सदस्य १७ अर्ज, कणेमध्ये सरपंचासाठी पाच अर्ज तर सदस्य १८ अर्ज, कोलेटीत सरपंचासाठी सात अर्ज तर सदस्य १९ अर्ज, निगडेमध्ये सरपंचासाठी चार अर्ज तर सदस्य २५ अर्ज, वरपमध्ये सरपंचासाठी आठ अर्ज तर सदस्य २१ अर्ज, पाटणोलीमध्ये सरपंच बिनविरोध तर सदस्य १५ अर्ज, हमरापूरमध्ये सरपंचासाठी चार अर्ज तर सदस्य २९ अर्ज, कळवेमध्ये सरपंचासाठी पाच अर्ज तर सदस्य ३० अर्ज, आमटेममध्ये सरपंचासाठी सात अर्ज तर सदस्य २२ अर्ज, डोलवीत सरपंचासाठी चार अर्ज तर सदस्य २९ अर्ज, जितेमध्ये सरपंचासाठी तीन अर्ज तर सदस्य ४४ अर्ज, दुरशेतमध्ये सरपंचासाठी चार अर्ज तर सदस्य १९ अर्ज, वरसईमध्ये सरपंचासाठी चार अर्ज तर सदस्य १७ अर्ज, दादरमध्ये थेट सरपंचासाठी तीन अर्ज तर सदस्य ३१ अर्ज, सोनखारमध्ये सरपंचासाठी पाच अर्ज तर सदस्य १७ अर्ज, कोप्रोलीत थेट सरपंचासाठी चार अर्ज तर सदस्य १७ अर्ज, मसद बु.मध्ये सरपंचासाठी चार अर्ज तर सदस्य २१ अर्ज, सापोली सरपंचासाठी तीन अर्ज तर सदस्य २२ अर्ज, रोडेमध्ये सरपंचासाठी सहा अर्ज तर सदस्य २४ अर्ज, मळेघरमध्ये सरंपचासाठी सात अर्ज तर सदस्य २० अर्ज, खरोशीमध्ये सरपंचासाठी चार अर्ज तर सदस्य २४ अर्ज, कारावमध्ये सरपंचासाठी आठ अर्ज तर सदस्य ४५ अर्ज, मुंढाणीमध्ये सरपंच बिनविरोध तर सदस्यपदासाठी पाच अर्ज दाखल झाले आहेत.

# कारच्या धडकेत विद्यार्थी जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

१५ वर्षीय विद्यार्थ्याला इनोव्हा कारची धडक लागून अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात विद्यार्थी जखमी झाला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि. ३) ११ वा. च्या सुमारास फिर्यादी शिक्षक भरत धोंडिबा काळे हे माध्यमिक विद्यामंदिर रातवड या शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन वनराई बंधारा बांधणे उपक्रमाकरिता गेले होते. उपक्रम संपल्यावर शिक्षकांनी शाळेच्या विद्यार्थ्यांना घरी जाण्यास सांगितले. अल्पेश अनिल जाधव (वय १५, रा. वावे दिवाळी) हा मुंबई–गोवा महामार्गावर भूवन स्टॉप येथे क्रॉस करीत असताना कारचालक अझमतुल्ला अलिमिया पालवकर हा त्याची इनोव्हा गाडी (क्र. एमएच ०१ पीए २७९९) ही भरधाव वेगात चुकीच्या लेनने घेऊन जात असताना या विद्यार्थ्याला समोरून धडकला.

या अपघातात विद्यार्थी जखमी झाला. या अपघाताची नोंद माणगांव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पो. नि. राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ह. दर्शन दोडकूलकर करीत आहेत.

## श्री दत्तमूर्ती प्रतिष्ठापना सोहळा

**पेण** : श्री क्षेत्र दिव (पिंगळ आळी) येथे नुकतेच श्री दत्तात्रेय मंदिराचे नूतनीकरण करण्यात आले आहे. या नवीन भव्य मंदिरात श्री दत्तात्रयांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना सोमवारी (दि. ५) मोठ्या थाटामाटात होणार आहे.

त्याचप्रमाणे श्रीदत्त जन्मोत्सव सोहळा बुधवारी (दि. ७) भक्तिभावाने साजरा केला जाणार आहे. या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

## पेणमध्ये दिव्यांगांसाठी विशेष शिबिराचा उपक्रम

**पेण : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि. ३) पेण उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार व तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे यांच्या पुढाकाराने पेण येथे जागतिक दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग बांधवांना विविध योजनांचा लाभ देण्याकरिता विशेष शिबिर झाले.

या शिबिरादरम्यान एका दिव्यांगांना केवळ एका तासांतच रेशन कार्ड काढून धान्य उपलब्ध करून देण्यात आले. याशिवाय निवडणूक विभागांतर्गत नवीन मतदान नोंदणी करण्यात आली, तर संजय गांधी योजनेंतर्गतही काही लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला.

# नवजात शिशूंसाठी नवी मुंबईत अतिदक्षता

## महापालिका रुग्णालयात एनआयसीयू बेड्समध्ये वाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका आरोग्य विभागामार्फत महापालिका क्षेत्रातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सेवासुविधा पुरविण्यात येत आहेत. यादृष्टीने रुग्णालयांमध्ये नवजात अतिदक्षता विभाग आणि लेबर वार्ड संपूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

नवी मुंबई महापालिकेची वाशी, नेरूळ व ऐरोली येथे सार्वजनिक रुग्णालये कार्यरत असून बेलापूर येथे माता बाल रूग्णालय कार्यरत आहे. याठिकाणी नवजात अतिदक्षता विभाग व लेबर वार्डची वाढती गरज लक्षात घेऊन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली बेड्सच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आलेली आहे. यामध्ये सार्वजनिक रूग्णालय वाशी येथील ९ एनआयसीयू बेड्समध्ये भर घालत २४ बेड्स. माँसाहेब मिनाताई ठाकरे रूग्णालय नेरूळ येथील ९ एनआयसीयू बेड्सची संख्या वाढवून २४ बेड्स, राजमाता जिजाऊ रूग्णालय



ऐरोली येथील १० एनआयसीयू बेड्सची संख्या वाढवून २२ बेड्स तसेच माता बाल रूग्णालय बेलापूर येथील चार एनआयसीयू बेड्सची संख्या वाढवून १२ बेड्स अशाप्रकारे आधीच्या एकूण ३२ एनआयसीयू बेड्समध्ये ५० बेड्सची भरीव वाढ करीत सद्यस्थितीत ८२ एनआयसीयू बेड्स कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

अशाप्रकारे नवजात अतिदक्षता विभाग व लेबर वार्डमधील बेड्समध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने जास्तीत जास्त नवजात शिशूंवर उपचार करणे शक्य होत आहे. नवजात अतिदक्षता विभागात वार्मरचा उपयोग हा प्रसुती कक्षात सुरूवातीच्या काळात नवीन जन्मलेल्या अर्भकाची काळजी घेण्यासाठी तसेच २८ दिवसांवरील कमी वजनाच्या बालकांसाठीसुध्दा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे फोटेथेरपी मशीन्सचा कावीळची लक्षणे असलेल्या नवजात शिशूंवर उपचार करण्यासाठी उपयोग होत आहे.

नमुंमपाच्या सार्वजनिक रूग्णालयामध्ये मागील ४ महिन्यात २७६ नवजात शिशूंवर उपचार करण्यात आले आहेत. यातील एक कि.ग्रॅ. पेक्षा कमी वजनाच्या तीन आणि १ ते १.२ कि.ग्रॅ. वजनाच्या नऊ अशा १२ नवजात शिशूंवर उपचार करून त्यांच्या वजनात वाढ करण्यात आली आहे. हृदयाशी संबंधित आजार असलेल्या दोन शिशूवर उपचार झाल्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. कमी दिवसांच्या ६० बाळावर उपचार करून त्यांना बरे करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे इतर विविध आजारांकरिता रूग्णालयात दाखल झालेल्या शिशूंवर उपचार करण्यात आलेले आहेत. या कार्यवाहीमध्ये वैद्यकिय अधिक्षक डॉ, उध्दव खिल्लारे, बालरोग तज्ज्ञ डॉ. माधवी इंगळे व प्राध्यापक डॉ. संध्या खडसे यांनी महत्वाची भूमिका बजावलेली आहे.

### आरोग्य सेवेचे सक्षमीकरण

महापालिकेच्या चार रूग्णालयांतील नवजात अतिदक्षता विभाग व लेबर वार्ड सुविधांमध्ये ५० बेड्सची मोठ्या प्रमाणात वाढ केल्याने तेथील आरोग्य सेवेचे सक्षमीकरण झाले असून यामुळे अधिक नागरिकांना वैद्यकिय सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होत आहे.

# गवताला आगी लावण्याचे प्रकार जनावरांच्या मुळावर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात क्रिकेटचा हंगाम सुरू झाला,आणि गवताला आग लागण्यास सुरूवात झाली. त्यामुळे अनेक जीव आगीत होरपळून मृत्यू झाल्याचे दिसत आहे.

पाऊस पूर्णपणे थांबला असून जमीन सुकली आहे. याचाच फायदा घेत आगी लावण्यात येत आहे. यामुळे निसर्गाची हानी होतच आहे, पण जन जनावरे, गायी, बैल म्हशी यांच्या सुक्याचाऱ्याची राख रांगोळी होत आहे. बिळात वास्तव्य करणारे भूचर प्राणी, पक्षी यांची हत्या केली जाते. शेतकरी, निसर्गप्रेमी, पर्यावरप्रेमींनी लावलेल्या झाडांची राख होत आहे. ही आग भुई ससा पकडणे, अन्य प्राण्यांची शिकार करणे, भरावसाठी माती चोरून नेणे, क्रिकेट प्रेमी खेळाचे मैदान तयार करण्यासाठी करतात,तर गावच शहरी करण होत असताना आजूबाजूचे बांधकाम व्यावसायिक जागा उपलब्ध व्हावी म्हणून असे प्रकार करत असावेत, अशी चर्चा सुरू आहे. याला वेळीच आला न घातल्यास निसर्गाची हानी होईलच, पण जीवांची हत्या होण्याचे प्रमाण वाढत जाईल.



# पोलीस भरतीविषयक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**उरण : बातमीदार**

एकलव्य करिअर कॅडमी उरण व विजय विकास सामाजिक संस्था उरण यांच्या वतीने उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली जेएनपीटी टाउनशीप, उरण येथे पोलीस भरती प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षण शिबिराचे प्रास्तविक एकलव्य अकॅडमीचे संस्थापक राम चौहान यांनी केले. या वेळी तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी पोलिस भरती संदर्भात मार्गदर्शन करतेवेळी थेरी आणि मैदानी तयारी तसेच अभ्यासक्रमातील अनेक बारकावे, पद्धती, अंकगणितातील टॅक्टटिज समजवून सांगीतल्या त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास



वाढण्याकरिता नक्कीच मदत झाली. तसेच या कार्यक्रमा मध्ये उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार उपस्थित होते. त्यांनी मुलांना आपल्या आईवडिलांच्या कृपाछत्राखाली संपूर्ण मिळत असलेले सहकार्य विचारात घेऊन फक्त दोन महिने उद्दिष्ट प्राप्तीसाठी असताना सातत्यपूर्ण प्रचंड मेहनत घेतली तर पुढील ४० ते ५० वर्षे आपले जीवन सुरक्षित कसे होईल हे सांगत असताना जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून गरुड झेप स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासिकेबाबत तसेच ऑनलाईन ॲप बाबतची माहिती दिली.

या कार्यक्रमावेळी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, विकास भोईर उपस्थित होते. या वेळी अकॅडमीच्या माध्यमातून ज्यांनी उद्दिष्ट साध्य केले आहेत, असे ४ पीएसआय १९ पोलीस कॉन्स्टेबल यांनी यश संपादन केले आहे त्यापैकी जे उपस्थित होते त्यांना तसेच राम चौहान यांना तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या हस्ते सुधाकर पाटील लिखित झुंज क्रांतीविरांची हे पुस्तक आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

## राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

# रामशेठ ठाकूर कॉलेजच्या विद्यार्थ्याची निवड

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयातील माहिती व तंत्र विभागातील द्वितीय वर्षाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी प्रतीक शर्मा याची खारघर येथील सरस्वती इंजिनिअरिंग महाविद्यालयामध्ये झालेल्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर आव्हान २०२२ प्रथम निवडफेरीमध्ये निवड झाली आहे. पुढील फेरीसाठी तो पात्र ठरला आहे तसेच पुढील आव्हान कॅम्प कवित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे १९ डिसेंबर ते २८ डिसेंबर या दरम्यान होणार आहे.



या शिबिरामध्ये सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापना विषयी प्रशिक्षण देण्यात येणार आहे आणि त्याचा फायदा सर्व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना होणार आहे. प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी प्रतीक शर्माला पुढच्या फेरीसाठी खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. डॉ. महादेव चव्हाण प्रा. कावेरी घोगरे, प्रा. भाग्यश्री शुक्ला, प्रा. तनुजा सुमन, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. प्रतीक्षा पाटील या सर्वांनी मार्गदर्शन केले व पुढील फेरीसाठी सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे या सर्वांनी प्रतीक शर्माचे कौतुक केले व पुढील फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

## निवडक

### औषधाच्या दुकानात चोरी

**पनवेल :** रेल्वेस्थानकातील एका औषधाच्या दुकानात चोरीची घटना घडली आहे. या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल रेल्वेस्थानकातील वन रुपीज या औषधाच्या दुकानात चोरीची घटना घडली. दुकानाच्या मागील भागातील ग्रील तोडून अज्ञाताने आत प्रवेश केल्याचे उघड झाले. यामध्ये दोन मोबाइल व रोख रक्कम चोरीला गेली आहे. या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नवी मुंबईत भीम अनुयायांना सुविधा

**नवी मुंबई :** सत्याग्रह महाविद्यालयाच्या सम्राट अशोक हॉस्टेल फॉर इडब्ल्युएस, सत्याग्रह हॉस्टेल आणि यशोधरा हॉस्टेलमध्ये चैत्यभूमी मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वान दिनी येणाऱ्या अनुयायांना राहणे, भोजन, विश्रांतीच्या सुविधा ५, ६ आणि ७ डिसेंबर २०२२ रोजी करण्यात आले आहे. सेक्टर ८ सीबीडी बेलापुर आणि सेक्टर १२ खारघर आणि सेक्टर २६ तळोजे नवी मुंबई येथे या सुविधा निशुल्क संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे. गरजू आणि इच्छुकांनी सुप्पारक भवन, प्लॉट नं. ५२, सेक्टर १९, खारघर, नवी मुंबई येथे संपर्क करावा, असे आवाहन प्राचार्य प्रा डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी केले आहे.

# श्री गणेशजी नाईक एसएससी सराव परीक्षेला सुरुवात

**नवी मुंबई : बातमीदार**

श्री गणेशजी नाईक एसएससी परीक्षेचा शनिवारी (दि. ३) नेरूळ येथील तेरणा कॉलेजमध्ये उत्साहात शुभारंभ झाला. आमदार गणेश नाईक आणि नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ट्रस्टचे अध्यक्ष आणि माजी खासदार संजीव नाईक ट्रस्टचे सचिव माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, अनंत सुतार, माजी महापौर सुधाकर सोनवणे माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत माजी सभागृह नेते रवींद्र इथापे भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत आदी उपस्थित होते.

१९९८ साली सराव परीक्षा उपक्रम सुरू केल्याचे सांगून लोकनेते नाईक यांनी या उपक्रमामागे विद्यार्थ्यांच्या मनातील दहावीच्या



परीक्षेची भीती नाहीशी करून मुख्य परीक्षेला त्यांनी आत्मविश्वासाने सामोरे जावे आणि उत्तम यश संपादित करावे हा होता. हा उद्देश आज सफल झाला असून आजपर्यंत दीड लाख विद्यार्थ्यांनी या परीक्षेचा लाभ घेतला आहे, अशी माहिती आमदार नाईक त्यांनी दिली.

शाळाबाह्य विद्यार्थ्यांना समुपदेशन करून त्यांना महापालिका अथवा खाजगी शाळांमधून शिक्षण घेण्यास सहकार्य करण्यासाठी कार्यक्रम हाती घेण्याची सूचना आमदार नाईक यांनी या वेळी केली. कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम करण्यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचे आवाहन देखील त्यांनी याप्रसंगी केले. सराव परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी एसएससी सराव परीक्षा उपक्रमाचे कौतुक केले.

या वेळी माजी आमदार संदीप नाईक म्हणाले की, ९०० विद्यार्थी आणि दोन परीक्षा केंद्र यापासून सुरू झालेली एसएससी सराव परीक्षेला आज भव्य आणि व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. दहा हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षेला बसतात. यावर्षी २८ परीक्षा केंद्र आणि तब्बल ७२ शाळांचा समावेश आहे. मराठी हिंदी आणि इंग्रजी या तीन माध्यमातून सर्व विषयांसाठी घेतली जाणारी ही परीक्षा महाराष्ट्रातील एकमेव परीक्षा आहे. ४०० तज्ञ शिक्षकांचा संच ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

### स्पीड रिव्हिजन ॲपद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

गणेश नाईक ट्रस्टचे सचिव संदीप नाईक यांनी सराव परीक्षा उपक्रमाविषयी माहिती देताना या वर्षी ३ ते १८ डिसेंबर या कालावधीमध्ये २८ केंद्रांवर ही परीक्षा होत असल्याचे सांगितले. १५ जानेवारीपर्यंत अचूक निकाल लावण्याचा प्रयत्न असणार आहे. त्यानंतर पारितोषिक वितरण समारंभदेखील होईल. सराव परीक्षांमधून आपल्या उणिवा विद्यार्थ्यांना कळतात आणि त्या दूर करून मुख्य परीक्षेला ते अधिक आत्मविश्वासाने सामोरे जातील. स्पीड रिविजन ॲप १० हजार विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या ॲपमधून विद्यार्थ्यांना वेळेचे नियोजन योग्य आहार करिअर कौन्सिलिंग यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

### महाराष्ट्रासाठी पथदर्शी उपक्रम

*महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी एसएससी सराव परीक्षा उपक्रम हा महाराष्ट्रासाठी पथदर्शी उपक्रम आहे असा या उपक्रमाचा गौरव केला. मागील २४ वर्षे सातत्याने या उपक्रमाच्या माध्यमातून दहावीच्या विद्यार्थ्यांचा पाया मजबूत करण्याचे काम सुरू आहे. या उपक्रमाचे अन्य शहरांनीदेखील अनुकरण करायला हवे.*

# उरण नगर परिषदेचे वाचनालय दर रविवारी राहणार पूर्णवेळ खुले

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

पनवेल प्रांताधिकारी राहुल मुंडके, उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुक्यात उरण नगरपरिषदेच्या माँसाहेब मीनाताई ठाकरे सार्वजनिक ग्रंथालयात गरुड झेप स्पर्धा परीक्षा अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. स्पर्धा परिक्षेच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वाचनालयात बसण्यासाठी हे वाचनालय आता दर रविवारी सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत पूर्णवेळ चालू ठेवण्याचा निर्णय वाचनालयाचे ग्रंथपाल संतोष पवार यांनी उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मान्यतेने घेतला.

पहिल्या दिवशी रविवारी



(दि. ४) तीन विद्यार्थिनी आणि पाच विद्यार्थी यांनी वाचनालयाच्या या नव्या सुविधेचा प्रत्यक्ष लाभ घेतला. दर रविवारी पूर्णवेळ अभ्यासिका या उपक्रमाचा शुभारंभ आजपासून सकाळी ८:३० वाजल्यापासून करण्यात आला.

केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा तसेच विविध शासकीय पदांसाठी असलेल्या स्पर्धा परिक्षेची पुस्तके वाचनालयात उपलब्ध असून विदयार्थ्यांना ही पुस्तके मोफत वाचायला दिली जातात. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही संतोष पवार यांनी केले आहे.

स्पर्धा परिक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक रविवारी सकाळी ८ ते रात्री १० या वेळेत वाचनालय चालू राहणार असल्याने स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या देविना मुंबईकर, हेमंत भोईर, शुभम गौडदाब, मयुर पाटील, अभिषेक कोळी, रश्मी म्हात्रे, प्रज्वली घरत, इम्रान खान, दिपक वायदंडे या विद्यार्थ्यांनी ही सूवर्णसंधी उपलब्ध करून दिल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, प्रांताधिकारी राहुल मुंडके, तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, मुख्याधिकारी राहूल इंगळे तसेच ग्रंथपाल संतोष पवार, वाचनालयाचे कर्मचारी जयेश वत्सराज यांचे विशेष आभार मानले आहेत.

# वेश्वीतील वणवा विझवला

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरण तालुक्यातील वेश्वी येथील एकवीरा डोंगर माथ्यावर अज्ञाताने डोंगराला वणवा लावला. केअर ऑफ नेचरच्या कार्यकर्त्यांनी तिथे धाव घेऊन वणवा विझवला.

संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर आणि त्यांच्या टीमने पुन्हा एकदा निसर्गाचं रक्षण केलं त्याचबरोबर त्या आगीच्या भक्षस्थानी येणाऱ्या लाखो जीव-जंतुंचे जीवदेखील वाचविले. खऱ्या अर्थाने जर निसर्गाचे संरक्षण आणि संवर्धन करायचे असेल तर आज समाजात केअर ऑफ नेचर सामजिक संस्था या सारख्या पर्यावरण प्रेमी संस्थांची आणि अश्या निसर्गप्रेमींची, वन्यजीव प्रेमिंची काळाची गरज असल्याचे मत निसर्गप्रेमी, पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.



# सात फुटी अजगराला जीवदान

**उरण : वार्ताहर**

चिरनेर येथील एका शेतकऱ्याच्या शेतावरच्या तळ्यात सात फुटी अजगर जाळ्यात अडकून पडल्याची माहिती फ्रेंड्स ऑफ नेचरचे अध्यक्ष जयवंत ठाकूर, त्यांची कन्या सृष्टी ठाकूर व त्यांचे सहकारी गौरव वशेणीकर यांना मिळताच, त्यांनी आपल्या इतर सहकाऱ्यांसोबत घटनास्थळ गाठले. सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी या अजगराची सोडवणूक करून त्याला जीवदान दिले.

या घटनेची माहिती तत्काळ उरण तालुका वनविभागाला देण्यात आली. त्यानंतर वनखात्याचे भाऊसाहेब डिविलकर, वनरक्षक संतोष इंगोले, राजेंद्र पवार यांनी या जखमी अजगराला उपचाराच्या व संवर्धनाच्या दृष्टीने ताब्यात घेतले. उपचारासाठी पुणे येथील रेस्क्यूअर्सच्या उपचार केंद्रात दाखल करण्यासाठी नेले आहे.



# राजपुरी वाहन पार्किंगचे दरवाजे उघडले

## पर्यटकांना मोठा दिलासा / जंजिरा किल्ला पाहण्यासाठी गर्दी





**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने राजपुरी नवी जेट्टी येथे असणारे वाहनतळ अखेर खुले केल्याने पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला आहे. डिसेंबर महिन्यातील गुलाबी थंडीचा आस्वाद घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने पर्यटक मुरूडमध्ये दाखल झाले आहेत. रविवारी (दि. ४) १५ शिडाच्या बोटींतून पर्यटकांना जंजिरा किल्ल्यावर नेण्यात येत होते.

सुप्रसिद्ध ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी येथून शिडाच्या बोटीतून पयटकांना नेले जाते. राजपुरी येथे जंजिरा किल्ला पहाण्यासाठी शेकडोच्या संख्येने पर्यटक येत असतात. या पर्यटक लोकांची चांगली व्यवस्था व्हावी यासाठी महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाकडून भले मोठे प्रवासी टर्मिनल बांधण्यात आले आहे. यामध्ये प्रवासी वर्गाला बसण्याची व्यवस्था, अल्पोहार, स्वछतागृह व शुद्ध पाण्याची व्यवस्था तसेच वाहन पार्किंग व्यवस्थासुद्धा करण्यात आली आहे.

प्रवासी टर्मिनलची इमारत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयाकडून पाच वर्षाच्या कराराने बून केटरर्स याना देण्यात आला होता, परंतु या बून केटरर्सकडून प्रवासी टर्मिनलची इमारतीची फारशी काळजी घेतली जात नाही.

अनेक महिन्यांचे बिल न भरल्यामुळे येथील वीज जोडणी तोडण्यात आली होती. बून केटरर्सने लिलावाचे पूर्ण पैसेसुद्धा महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाला न दिल्यामुळे बोर्डाने वाहन पार्किंग बंद करून या गेटला टाळे मारण्यात आले होते.

सुमारे १५० वाहन पार्किंग असणारे गेट बंद केल्यामुळे असंख्य पर्यटकांच्या गाड्या समुद्रकिनारी व रस्त्यावर उभ्या कराव्या लागल्यामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला होता.

यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने राजपुरी नवी जेट्टी येथे असणारे वाहनतळ खोलावे व पर्यटकांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिक व पर्यटक यांच्याकडून करण्यात आली होती. अखेर वाहनतळाचा दरवाजा उघडण्यात आल्याने शेकडो पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### रस्त्यावरील वाहतूक कोंडी झाली कमी

**बंदर निरीक्षक यशोधन कुलकर्णी यांनी सांगितले की, पर्यटकांच्या गाड्या बाहेर रस्त्यावर लागल्याने वाहतुकीला मोठा अडसर होत होता. मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वाहने आतमध्ये लावण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता येथे कोणतीही वाहतूक कोंडी होणार नाही. सध्या सर्व पर्यटकांना मोफत पार्किंग उपलब्ध आहे.**

## चेरफळवाडी-उद्धर रस्त्याची ग्रामस्थांकडून दुरुस्ती

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील चेरफळवाडी व लोलगेवाडी ही दुर्गम गावे आहेत. येथे जाण्यासाठी पक्का रस्ता तर नाहीच, मात्र असलेल्या कच्च्या रस्त्याचीसुद्धा दुरवस्था झाली आहे. अखेर येथील ग्रामस्थ एकत्र आले व चेरफळवाडी व लोलगेवाडी ते उद्धर या रस्त्याची श्रमदान करून नुकतीच दुरूस्ती केली.

शासन व लोकप्रतिनिधी यांच्यावर विसंबून न राहता रस्ता दुरूस्तीसाठी लागणारा सर्व खर्च गावकीमधून करण्यात आला. येथील शेतकऱ्यांना भातपीक व इतर शेती उत्पादने शहरात विकायला घेऊन जाण्यासाठी याच रस्त्यावरून जावे लागते, मात्र खराब मार्गामुळे येथून चालणेसुद्धा अवघड होते. त्यामुळे गावकऱ्यांनी एकत्र येऊन श्रमदान करून रस्त्याची दुरूस्ती केली. या वेळी गावकऱ्यांनी ट्रॅक्टरने माती आणली. सर्वांनी मिळून ही माती रस्त्यावर टाकून रस्ता समतल केला. दगडगोटे बाजूला केले आणि हा कच्चा रस्ता सुस्थितीत केला. प्रशासनाने याकडे लक्ष घालून पक्का डांबरी रस्ता बनविण्याची मागणीदेखील येथील ग्रामस्थांनी केली आहे.

या वेळी सरपंच मुक्ता बांगारे, गावकी अध्यक्ष दामा निरगुडे, खजिनदार नारायण हंबीर, संजय निरगुडे, सुरेश निरगुडे, काशिनाथ बांगारे, केशव हंबीर, राम वाक आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



## कर्जत पंचायत समितीमध्ये दिव्यांगांचा सत्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

जागतिक अपंग दिनानिमित्त कर्जत पंचायत समितीमध्ये दिव्यांग यांचा सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे दिव्यांगांसाठी असलेल्या योजनांची माहिती देण्यात आली. या वेळी कर्जत तालुक्यातील १५०० अपंगांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मेळाव्याचे उद्घाटन कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांचे हस्ते झाले. ग्रामपंचायत विस्तार अधिकारी उज्वला भोसले, कृषी विस्तार अधिकारी चिंतामण लोहकरे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक गोवर्धन नखाते, आरोग्य विस्तार अधिकारी आर. एन. गायकवाड, पंकज भोईर यांचे हस्ते सन्मान करण्यात आला.



ग्रामपंचायत विभगाच्या विस्तार अधिकारी उज्वला भोसले यांनी अपंगांसाठी राबविल्या जात असलेल्या विविध योजनांची माहिती दिली आणि या पुढे कर्जत तालुक्यातील सुमारे १५०० अपंगांकरिता सामुहिक लाभांच्या विविध योजना एकत्रितपणे राबविल्या जातील, याची माहिती दिली.

## महाडमध्ये दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप

**महाड : प्रतिनिधी**

महाड पंचायत समिती समाजकल्याण विभाग आणि श्री. समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्या वतीने शनिवारी (दि. ३) जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. या वेळी उपस्थित दिव्यांग बांधवाना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.



छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाची सुरवात झाली. महाडचे समाज कल्याण विस्तार अधिकारी डी. के. वाघमोडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष निलेश पवार, समाजकल्याण कनिष्ठ सहाय्यक राजू राठोड, सामाजिक कार्यकर्ते स्वरूप खांबे, श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्या अध्यक्षा दीप्ती शेडगे, सचिव मुबीन देशमुख, सल्लागार सुरेश पाटील, शैलेश बावळेकर यांच्यासह दिव्यांग बांधव उपस्थित होते.

केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग बांधवानी पुढे आले पाहिजे, असे मत डी. के. वाघमोडे यांनी या वेळी व्यक्त केले. तर दिव्यांग बांधवानी आपले शारीरिक दिव्यांग बाजूला ठेवून मानसिक खंबीर होऊन व्यावसायिक प्रगती साध्य केली पाहिजे, याकरिता दिव्यांग संस्थेने स्वयंरोजगार कार्यशाळेचे आयोजन केले पाहिजे, असे मत निलेश पवार यांनी व्यक्त केले. या वेळी उपस्थित दिव्यांग बांधवांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री दिव्यांग संस्थेचे रायगड विभागीय प्रमुख अशोक औकीरकर, मुकुंद येलकर आदीनी विशेष मेहनत घेतली.

## माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये मतदार नोंदणी



**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी.सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये आयक्यूएसी विभाग व तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने १८ वर्ष पूर्ण झालेल्या मतदारांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. जवळपास ६० नवीन मतदारांनी मतदान ओळखपत्रासाठी फॉर्म भरून दिला.

कार्यक्रमासाठी तहसील कार्यालय पुरवठा शाखेचे नायब तहसीलदार एस. बी. माने, तलाठी भारुमर मॅडम, सतिष पंगारे, महसूल सहाय्यक बुद्धगोष पवार, प्राचार्य हर्षल जोशी, डॉ.चंद्रकांत माळी, प्रा. अशोक मोरे व आयक्युएसी समन्वयक अमित बाकाडे, दिलीप ढेपे, प्रा. पवार तसेच कर्मचारी उपस्थित होते. भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी नवमतदारांनी फक्त मतदार म्हणून नोंदणी न करता प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेत भाग घेऊन योग्य उमेदवाराला मतदान केले पाहिजे, असे माने यांनी आवाहन केले. अमित बाकाडे यांनी आभार मानले.

## श्री दत्त जयंतीनिमित्त मेढा येथे धार्मिक कार्यक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

मेढा येथे सालाबादप्रमाणे बुधवारी (दि. ७) श्री दत्त जयंती उत्सव साजरा होत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



मंगळवारी (दि. ६) चित्रकला व रांगोळी स्पर्धा, दुपारी हळदी कुंकू समारंभ, संध्याकाळी हरिपाठ मेढा विभाग पंचक्रोशी वारकरी संप्रदाय, रात्री वारकरी संप्रदायासाठी भोजन, हभप किर्तनकार दिनेश पाटील महाराज डोलवी- पेण सोबत मेढा विभाग पंचक्रोशी वारकरी संप्रदायाचे कीर्तन, बुधवारी (दि. ७) पहाटे ४.३० वा. काकड आरती, सकाळी ७ वा. श्री दत्तगुरु महापुजा, सकाळी ९ वा. श्री दत्तगुरु जन्मोत्सव, सकाळी ११ दु. २ महाप्रसाद, दुपारी १२ ते १ भजन दत्त आळी ग्रामस्थ भजन मंडळ मेढा यांचे कीर्तन, हभप श्री दळवी महाराज वांगणी सोबत मेढा विभाग पंचकोशी वारकरी भजन मंडळी यांचे किर्तन, संध्याकाळी ६ ते रात्री १२ श्री दत्तगुरु पालखी मिरवणुकीसोबत दत्त आळी ग्रामस्थ भजन मंडळ, मेढा विभाग वारकरी संप्रदाय मंडळ, गुरुवारी (दि. ८) विद्यार्थी गुणगौरव असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

## रायगडातील पोलिसांसाठी अलिबागमध्ये आरोग्य शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड थळ आयोजित रायगड पोलीस आरोग्य शिबिराचे उद्घाटन कोकण परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक संजय मोहिते यांच्या हस्ते आणि आरसीएफ थळ कार्यकारी संचालक अनिरुद्ध खाडिलकर यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. २) अलिबाग येथे जिल्हा पोलीस मुख्यालयात करण्यात आले.

पोलिस अधीक्षक रायगड यांच्या सूचनेवरून पोलीस उप अधीक्षक (गृह) मुख्यालय अलिबाग यांनी केलेल्या विनंतीनुसार अलिबाग उप विभागातील अलिबाग, मांडवा सागरी, रेवदंडा आणि मुरुड ठाण्यातील ४० वर्षे वयावरील अधिकारी व अंमलदार यांच्या आरोग्य तपासणीसाठी आरसीएफतर्फे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सुमारे २०० पोलीस कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी तज्ज्ञ डॉक्टर्सकडून या शिबिरात करण्यात आली. यात रक्तदाब, रक्तशर्करा, बीएमआय, सीबीसी/एचबीए १सी, लिपिड प्रोफाईल आणि नेत्रचिकित्सा या तपासण्याचा समावेश आहे.



कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहोरात्र तत्पर असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या स्वास्थ्याची काळजी घेत कृतज्ञता व्यक्त करावी या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आरसीएफ थळतर्फे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, आरसीएफचे मानव संपदा व प्रशासन मुख्य महा व्यवस्थापक श्रीनिवास कुलकर्णी, अतिरिक्त कार्यकारी उप विभागीय पोलीस अधिकारी जगदीश काकडे यांसह आरसीएफ व पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## माथेरान नगरपालिकेतर्फे विविध कार्यक्रम



**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमध्ये नगरपालिकेतर्फे जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून नगरपालिका उत्पन्नातून राखीव पाच टक्के निधी दिव्यांगांना मुख्याधिकारी सुरेखा भणगे शिंदे यांच्या हस्ते देण्यात आला.

माथेरानमधील दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांच्या नेतृत्वाखाली आतापर्यंत ३३ जणांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळाले आहे व इतर सुविधांसाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे.

येथील कम्युनिटी सेंटर येथे चेंबूर येथील आमदार प्रकाश भाऊ फातर्पेकर तसेच स्व. मीनाक्षी तमिळ आमुदन यांच्या स्मरणार्थ दिव्यांग व्यक्तींसाठी दोन व्हीलचेअर, दोन वॉकर, पाच हँडस्टिक व दोन कोमोड स्टूल यांचे वाटप करण्यात आले.

या वेळी दिव्यांग संघटना अध्यक्ष चंद्रकांत जाधव, भाजप शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, प्रदीप घावरे, संदीप कदम, राजेश चौधरी, जनार्दन पारटे, सुभाष भोसले व भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

## किल्ले रायगडावर गडरोहण स्पर्धा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्ताने प्रतिवर्षीप्रमाणे किल्ले रायगड येथे ८ जानेवारी २०२३ रोजी गडारोहण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या जिल्हास्तरीय गडरोहण स्पर्धेसाठी पुरुष प्रथम गट वय १४ वर्षापर्यंत, द्वितीय गट वय १४ ते १७ वर्षापर्यंत, तृतीय गट वय १७ पूर्ण ते २१ वर्षापर्यंत, चतुर्थ खुला गट तर महिला प्रथम गट वय १४ वर्षापर्यंत, द्वितीय गट वय १४ ते १७ वर्षांपर्यंत, तृतीय खुला गट असणार आहे. प्रत्येक गटात किमान १० स्पर्धक असणे आवश्यक आहे. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल. चित्तदरवाजा-महादरवाजा-होळीचा माळ असा स्पर्धेचा मार्ग राहिल. स्पर्धेसाठी रुपये २० शुल्क आहे.

## मृत्यूनंतरही पोलीस अधिकाऱ्याने जोपासली सामाजिक बांधिलकी

### हृदय, किडनी आणि डोळे केले दान

**पाली : प्रतिनिधी**

मरावे परी अवयव रुपी उरावे ही उक्ती पोलीस उपनिरीक्षक गणपत अंबाजी पिंगळे (वय ५७) यांनी मरणोत्तर अवयवदान करून सार्थ करून दाखवली आहे. आपल्या सेवा काळातसुद्धा त्यांनी अनेक सामाजिक कार्यात योगदान दिले आहे. रायगड जिल्ह्यातील ठाकूर समाजतील ते पहिले पोलीस उपनिरीक्षक आहेत.



गणपत पिंगळे हे नागोठणेनजीक रा. पिंपळवाडी, वासगाव, येथे वास्तव्यास होते, तर मुंबई गोवंडी येथे ते पूर्वी कार्यरत होते. आपल्या गावी असतांना त्यांची तब्येत अचानक खालावली आणि त्यांना ब्रेनस्ट्रोक आला. त्यांना पनवेल कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले, मात्र तेथे त्यांना ब्रेन डेड घोषित करण्यात आले.

मरणोत्तर अवयवदान करावे हा संकल्प गणपत पिंगळे यांनी केला होता.



त्यानुसार त्यांच्या कुटुंबियांना अवयवदानाचा निर्णय घेतला. गणपत पिंगळे यांचे डोळे, किडनी व हृदय काढून गरजवंतांना पाठविण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. पिंगळे हे कष्टकरी ठाूर समाजातून येऊन अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन पोलीस अधिकारी झाले होते. २६/११च्या दहशतवादी हल्ल्यात एटीएस कमांडो अधिकारी म्हणून त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांनी सुधागड तालुक्यातील शरदवाडी येथील दारूकांडबाबत केलेले काम व मदत उल्लेखनीय होती.

### रुग्णालयाने दिली मानवंदना

**एमजीएम रुग्णालयाच्या स्थापनेपासूनची अशा प्रकारे विविध अवयवदान करण्याची ही दुसरी घटना आहे. या वेळी रुग्णालयाने गणपत पिंगळे यांना मानवंदना दिली. रुग्णालयाचे डीन, व्यवस्थापक यांच्यासह सर्व पदाधिकारी, डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते.**


# अर्जेंटिना उपांत्यपूर्व फेरीत

## मेस्सीने मोडला दिग्गज मॅराडोनाचा विक्रम

**अल रायन : वृत्तसंस्था**

फिफा विश्वचषक स्पर्धेत लिओनेल मेस्सीच्या अर्जेंटिना संघाने शानदार खेळ दाखवत ऑस्ट्रेलियाचा २-१ असा पराभव केला. यासह अर्जेंटिना उपांत्यपूर्व फेरीसाठी पात्र ठरला आहे.

मेस्सीने अर्जेंटिनासाठी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम १६च्या सामन्यात पहिला गोल केला आणि संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. विश्वचषकात आठ गोल करणाऱ्या दिग्गज डिएगो मॅराडोनाला मागे टाकत स्टार फुटबॉलपटू मेस्सीने विश्वचषकातील आपला नववा गोल केला तसेच बाद फेरीतील अर्जेंटिनाचा हा पहिला गोल ठरला. या गोलमुळे तो अर्जेंटिनासाठी विश्वचषकातील



दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक गोल करणारा खेळाडू बनला. आता गॅब्रिएल बतिस्तुतापेक्षा फक्त एक गोल मागे आहे. पुरस्कार स्वीकारताना त्याने अर्जेंटिना संघाच्या खेळाचे साक्षीदार असणाऱ्या चाहत्यांचे आभार मानले.

अहमद बिन अली स्टेडियमवर झालेल्या अंतिम १६च्या रोमहर्षक फेरीत ऑस्ट्रेलियाचा २-१ असा पराभव करून अर्जेंटिनाने फिफा विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. पहिल्या हाफमध्ये एका गोलची आघाडी घेतल्यानंतर अर्जेंटिनाने ब्रेकनंतर लगेचच आपली रणनीती बदलली आणि तीन सदस्यांच्या बचावाकडे वळले. त्यांनी सामरिक स्विचचा परिणाम म्हणून त्यांचा दुसरा गोल केला. मॅट रायनने एक चूक केली ज्याचा फायदा ज्युलियन अल्वारेझला झाला. पहिल्या हाफमध्ये अर्जेंटिनासाठी गोल करून मेस्सीने पुन्हा एकदा क्षमता सिद्ध केली.

## नेदरलँड्स संघही दाखल

**दोहा** : सुरुवातीपासूनच केलेल्या आक्रमक खेळाच्या बळावर नेदरलँड्सने अमेरिकेवर ३-१ असा विजय मिळवत फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.



उपउपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेने तुलनेने बलाढ्य नेदरलँड्सला चांगली झुंज दिली, मात्र नेदरलँड्सने गोलच्या संधींचा अधिक चांगला वापर करत विजय संपादन केला. सामन्याच्या १०व्या मिनिटाला डेन्झेल डंफ्रिसच्या साहाय्याने आघाडीपटू मेम्फिस डिपेने गोल करीत नेदरलँड्सला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या सत्राच्या भरपाई वेळेत पुन्हा एकदा डंफ्रिसच्या मदतीने अनुभवी डेली ब्लिंडने गोल करीत नेदरलँड्सला २-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्रातही नेदरलँड्सने आपला आक्रमक खेळ सुरूच ठेवला. ८१व्या मिनिटाला ब्लिंडच्या पासवर डंफ्रिसने गोल करीत नेदरलँड्सला ३-१ अशा भक्कम स्थितीत पोहचवले.

## आंद्रे रसेलचा धडाका

▌ अवघ्या ११ चेंडूंत झळकाविले अर्धशतक



**अबू धाबी : वृत्तसंस्था**

कॅरेबियन स्टार फलंदाज आंद्रे रसेल हा त्याच्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. रसेलचे वादळ अबू धाबी टी-१० लीगमध्ये पाहायला मिळाले. त्याने तुफानी अर्धशतक झळकावित डेक्कन ग्लॅडिएटर्सला स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहचवले.

या सामन्यात आंद्रे रसेलने ३२ चेंडूंत चौकार आणि षटकारांची बरसात करीत ६३ धावा केल्या. यादरम्यान रसेलचा स्ट्राइक रेट १९६.८७ होता. कॅरेबियन पॉवर हिटरच्या बॅटमधून सात चौकार आणि चार षटकार निघाले. म्हणजे त्याने आपल्या खेळीत केवळ ११ चेंडूंत ५२ धावा केल्या. या खेळीच्या जोरावर डेक्कन ग्लॅडिएटर्सने चार चेंडू राखून सामना जिंकला. तत्पूर्वी रसेल हा करीम जनतच्या षटकात बाद झाला.

## एकदिवसीय सामन्यातील धावांमध्ये रोहितने टाकले अझरुद्दीनला मागे



**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात कर्णधार रोहित शर्माने टीम इंडियाचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीनला मागे टाकत भारताकडून सर्वाधिक धावा करण्याच्या यादीत त्याचे नाव जोडले.

न्यूझीलंडनंतर भारताचा संघ बांगलादेशच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात टीम इंडिया तीन मर्यादित षटकांची एकदिवसीय मालिका आणि दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. न्यूझीलंडच्या दौऱ्यात अनेकांना विश्रांती दिली होती, आता ते सर्व खेळाडू बांगलादेशच्या दौऱ्यात परतले आहेत. यामध्ये रोहित शर्मा, विराट कोहली, केएल राहुल यांचा समावेश आहे. बांगलादेश दौऱ्याची सुरुवात एकदिवसीय मालिकेने झाली. यातील पहिला सामना रविवारी (दि. ४) ढाका येथील शेर-ए-बांगला स्टेडियमवर खेळला गेला.

बांगलादेशचा कर्णधार लिटन दासने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाहुण्या संघाला फलंदाजीला आमंत्रित करीत त्यांनी धावांचा पाठलाग करणे पसंत केले. बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात मैदानात येताच रोहित शर्माने भारताचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीनचा एकदिवसीय क्रिकेटमध्ये केलेल्या धावांचा आकडा पार करण्यात यश मिळवले आहे. अझरुद्दीनने एकदिवसीय क्रिकेटमध्ये ९३७६ धावा केल्या आहेत.



## ॲथलेटिक्स स्पर्धेत उत्तम मानेंचे यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नाशिक येथे नुकतीच ज्येष्ठ नागरिकांची राष्ट्रीय ॲथलेटिक्स स्पर्धा झाली. या स्पर्धेत सानपाडा येथे ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य उत्तम माने यांनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करीत यश मिळविले.

माने यांनी ६५ वयोगटावरील गटात लांब उडीत तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यांचे अभिनंदन होत आहे.

## सचिनच्या 'त्या' रनआऊटवर अक्रमचा खुलासा

### पुस्तकात नमूद केले परत न बोलाविण्याचे कारण

**कराची : वृत्तसंस्था**


पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू वसीम अक्रमने आपल्या पुस्तकात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या धावबादशी संबंधित एक धक्कादायक खुलासा केला आहे. या धावबादनंतर सुनील गावसकरने सचिनला पुन्हा मैदानात बोलावण्यास सांगितले होते, पण अक्रमने नकार दिला.



सन १९९८-९९दरम्यान आशियाई कसोटी चॅम्पियनशिप अंतर्गत कोलकाता येथे भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना खेळला जात होता. पहिल्या डावात सचिन तेंडुलकरला शोएब अख्तरने यॉर्कर चेंडूवर त्रिफळाचित केले होते, तर दुसऱ्या डावात सचिनला वादग्रस्त पद्धतीने धावबाद करण्यात आले होते. यावर आता पाकिस्तानचा माजी खेळाडू वसीम अक्रमने धक्कादायक खुलासा केला आहे.

दुसऱ्या डावात सचिन ज्या पद्धतीने धावबाद झाला होता, तो मोठा वादाचा विषय बनला होता. धाव घेताना सचिन हा शोएबला धडकल्यामुळे धावबाद झाला. त्यामुळे ईडन गार्डनमधील चाहतेही संतापले. लोकांनी दगडफेक सुरू केल्याने सामना थांबवावा लागला होता. या सर्व घटनेचे वर्णन करताना वसीम अक्रमने आपल्या पुस्तकात नमूद केले की, ब्रेकच्या वेळी सामनाधिकारींसोबत सुनील गावस्कर माझ्याकडे आले. तुम्ही सचिनला पुन्हा खेळायला बोलवा, असे ते म्हणाले. भारतात लोक तुमच्यावर खूप प्रेम करतील. गावसकर यांना कोलकात्यातील गर्दी किती उत्तेजित होते हे माहीत होते. मी म्हणालो की, माझेही चाहते आहेत आणि मला त्यांची काळजी करावी लागेल. हा माझा निर्णय नाही. अंपायरने सचिनला बाद दिले आणि निर्णय बदलायला उशीर झाला. हा एक अपघात होता हे आपल्या सर्वांना माहीत आहे, पण क्रिकेटमध्ये अशा घटना घडतात.

## बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनविरोधात वयचोरीचा गुन्हा



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

अर्जुन पुरस्कार विजेता आणि बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता शटलर लक्ष्य सेनवर वय चोरून लावल्याचा आरोप करण्यात आला आहे. माध्यमातील माहितीनुसार त्याच्याविरुद्ध बंगळुरूमध्ये एफआयआरही नोंदवण्यात आली आहे. वृत्तानुसार लक्ष्य सेनवर कनिष्ठ स्तरावर स्पर्धा करताना वय-प्रतिबंधित स्पर्धांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी त्याच्या वयाची फसवणूक केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

नागराज एमजी नावाच्या व्यक्तीच्या तक्रारीनंतर बंगळुरू पोलिसांनी लक्ष्य आणि त्याच्या बॅडमिंटन अकादमीच्या प्रशिक्षकाविरुद्ध एफआयआर नोंदवला आहे. नागराजा शहरात बॅडमिंटन अकादमीही चालवतो. अलीकडेच एका स्थानिक न्यायालयाने पोलिसांना २१ वर्षीय लक्ष्याविरुद्धच्या आरोपांची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. लक्ष्य बंगळुरूमधील प्रकाश पदुकोण बॅडमिंटन अकादमीमध्ये प्रशिक्षण घेतो.

एफआयआरमध्ये लक्ष्य, त्याचे प्रशिक्षक विमल कुमार, त्याचे वडील धीरेंद्र सेन, त्याचा भाऊ चिराग आणि आई निर्मला सेन यांचा समावेश आहे. चिराग स्वतः बॅडमिंटनपटू आहे आणि धीरेंद्र भारतीय क्रीडा प्राधिकरणात प्रशिक्षक आहेत. माध्यमातील माहितीनुसार नागराजाचा आरोप आहे की प्रशिक्षक विमल यांनी लक्ष्याच्या आई-वडिलांच्या सहकार्याने २०१०मध्ये जन्म प्रमाणपत्र तयार केले होते, ज्यामध्ये चिराग आणि लक्ष्य यांच्या वयात हेराफेरी करण्यात आली होती. यामुळे त्याला वयोगटातील स्पर्धांमध्ये भाग घेता आला. अन्यथा तो स्पर्धेसाठी अपात्र ठरला असता.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com